म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय कादंबरी
दा. क्र. 2069

BVBK-0402981

# कथासरित्सागरातील अनमोल मोती

## भाग आठवा

BVBK-0402981

निवेदक

मा. गो. काटकर

म. सं. सं. [illegible], वाचनालय [illegible].
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २८१९ दिनांक 3/8/62
विषय बा. वा. क्र. ....

कौस्तुभ प्रकाशन
नागपूर २२

**प्रकाशक :**
**शैलेश देशपांडे,**
**कौस्तुभ प्रकाशन,**
**२९/अ, नवनिर्माण सोसायटी,**
**राणा प्रतापनगर,**
**नागपूर २२**

**मुद्रक :**
प्रभाकर धाक्रस,
'सूर्य ऑफसेट,
रामदास पेठ,
**नागपूर १०**

© **सर्वाधिकार :**
मा. गो. काटकर
सोलापूर

**नवीन आवृत्ती :**
**१५ ऑगस्ट १९९३**

**मूल्य :**
**वीस रुपये**

## *निवेदन*

*कुमार मित्रांनो!*

*पंडित सोमदेव हा विलक्षण प्रतिभाशाली कवी होता. त्याने बृहत्कथेतून कथा-सरित्सागरात घेतलेल्या साडेतीनशेहून जास्त छोट्या मोठ्या कथांची मोठी बहारदार व चित्ताकर्षक गुंफण केलेली आहे. मानवी स्वभावाची विविधता दाखविणाऱ्या या नाना प्रकारच्या निवडक कथांचे संकलन या संग्रहात केले आहे. या महान कथासागरातील मनोरंजक व उद्‌बोधक कथा तुम्हास नक्कीच आवडतील असा विश्वास वाटतो.*

**- मा. गो. काटकर**

## कथाक्रम

| | |
|---|---|
| १) जो जसा तो कुठेही तसा | ३ |
| २) बुद्धिमान वररूची | ५ |
| ३) दानशूर तारावलोक | २६ |
| ४) देणाऱ्याला दैव देते | ३३ |
| ५) सोमप्रभा कुणाला द्यायची ? | ३६ |
| ६) समुद्र शरण आला | ४३ |
| ७) जसे धैर्य तशी दैवकृपा | ४७ |

२६८९ 37.B16 ११३ द.

# जो जसा तो कुठेही तसा

एकदा काय झाले, आकाशातून भरारत जाणाऱ्या एका बहिरीससाण्याने पकडलेली एक लहान उंदरी त्याच्या पंज्यातून निसटली आणि वनातल्या एका आश्रमाजवळ पडली. त्यावेळी कंदमुळे आणण्यास वनात जाण्यासाठी आश्रमातून बाहेर पडलेल्या एका मुनीच्या दृष्टीस ती पडली. तेव्हा त्या दयाळू मुनीने तिला हळुवारपणे उचलून आपल्या आश्रमात नेले. आणि आपल्या तपाच्या प्रभावाने त्या छोट्या उंदरीचे एक लहान सुंदर बालिकेत रूपांतर केले.

नंतर वत्सलतेने पालन पोषण करीत असलेल्या त्या मुनीच्या आश्रमात ती सुंदर कन्या दिवसेंदिवस वाढत जाऊन अखेर ती उपवर झाली. तेव्हा आपली ती सुंदर मानसकन्या श्रेष्ठ अशा एखाद्या बलवंतालाच द्यावी असे त्या मुनीने ठरविले. त्याप्रमाणे त्याने प्रथम सूर्यनारायणाला आवाहन केले. त्या प्रमाणे तो आल्यावर मुनी त्याला म्हणाला, 'सूर्यनारायणा, उपवर झालेली माझी स्वरूप सुंदर मानसकन्या श्रेष्ठ अशा बलवंतालाच द्यावी असं मी ठरविलं आहे. तेव्हा तू तिचा स्वीकार कर!'

असे मुनीचे शब्द ऐकून सूर्यनारायण म्हणाला, 'मुनिवर्य, माझ्यापेक्षा मेघ जास्त बलवंत आहे. कारण एका क्षणात तो मला पूर्णपणे आच्छादून टाकतो!' सूर्यनारायणाचे बोलणे खरेच असल्याने मुनीने एका मेघाला बोलावले. आणि सूर्यनारायणाला जे सांगितले होते तेच त्याला सांगितले. तेव्हा मेघ म्हणाला, 'मुनिवर्य, माझ्यापेक्षा वारा जास्त बलवंत आहे. तो आपल्या सामर्थ्यानं मला आकाशातून पार पिटाळून लावतो!' असे मेघाचे म्हणणे योग्यच असल्यामुळे मुनीने ते मान्य करून त्याला निरोप दिला.

नंतर मुनीने वाऱ्याला बोलावताच तो घोंघावत तिथे आला. तेव्हा 'तू महाबलवंत आहेस म्हणून तू माझ्या सुंदर मानसकन्येचा स्वीकार कर' असे

मुनीने त्याला सांगितले. तेव्हा वारा थोडा हिरमुसला होऊन म्हणाला, 'मुनिवर्य, खरंच, मी महाबलवान नाही. माझ्यापेक्षा पर्वत जास्त बलवान आहेत. सर्वांना जरी जागचे हलविण्याचे सामर्थ्य माझ्या ठायी असले तरी पर्वतापुढे मात्र माझं काही चालत नाही. मी त्यांना तिळभरसुद्धा इकडं तिकडं सरकवू शकत नाही !'

असे वाऱ्याचे सत्य व स्पष्ट शब्द मुनीला पटले आणि त्याने वाऱ्याला जाण्यास सांगितले. नंतर मुनीने एका पर्वताला आवाहन करून त्याला आपल्या मुलीचा स्वीकार करण्यास सांगितले. तेव्हा तो म्हणाला, 'मुनिवर्य, माझ्यापेक्षा उंदीर फार बलवान आहेत. कारण माझं अंग एवढं कठीण असून सुद्धा त्याला असंख्य भोके पाडून त्यात ते मोठ्या सुखासमाधानात राहतात. मी त्यांचा प्रतिकार करू शकत नाही.'

असे पर्वताचे बोलणे खोटे नव्हते. तेव्हा मुनीने त्याला जाण्यास सांगून त्याच वनातील एका उंदराला बोलावून घेतले. तो समोर येताच मुनी त्याला म्हणाला, 'या माझ्या मानसकन्येशी तू लग्न करावं अशी माझी इच्छा आहे.' असे मुनीचे शब्द ऐकून आश्चर्यचकित झालेला तो उंदीर म्हणाला, 'मुनिवर्य, आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. पण ही माझ्याबरोबर माझ्या बिळात येणार कशी व तिथं राहणार कशी ?'

'ही उंदराची शंका योग्यच आहे. तेव्हा या कन्येला आता उंदरीणच केली पाहिजे' असा विचार करून मुनीने त्या कन्येकडे बघत, 'ही पूर्वीप्रमाणेच उंदरीण होवो' असे शब्द उच्चारले. त्याप्रमाणे ती उंदरीण झाली. नंतर मुनीने ती उंदराच्या स्वाधीन केली. आणि उंदीर मुनीच्या कृपेने प्राप्त झालेल्या भार्येला घेऊन आपल्या बिळात गेला.

अशा रीतीने जो जसा असतो तो फार दूर जाऊन सुद्धा तसाच राहतो.

# बुद्धिमान वररुची

**आ**पल्या भारतात फार वर्षांपूर्वी कौशांबी या नावाचे एक नगर होते. त्या नगरात एक वेदविद्या प्रवीण द्विज राहात होता. त्याचे नाव होते सोमदत्त. आणि त्याच्या बायकोचे नाव होते वसुदत्ता. त्या दोघांचा संसार सुखाने चालला होता. बराच काळपर्यंत त्यांना अपत्य नव्हते. वसुदत्ता गतजन्मीची शापित मुनिकन्या होती. तिच्या पुण्याईमुळे अखेर तिला मुलगा झाला. त्याचे नाव वररुची असे ठेवण्यात आले. तो लहान असतानाच त्याचा पिता सोमदत्त कालवश झाला. तेव्हा वसुदत्ता दुसऱ्यांच्या घरी कामे करून आपला एकुलता एक मुलगा वररुची याचे पालन पोषण करू लागली.

एके दिवशी फार दूरवरचा प्रवास करून थकलेले दोन प्रवासी वसुदत्तेच्या घरी रात्रीच्या मुक्कामाकरिता आले. वसुदत्तेने त्यांची चौकशी करून त्यांचे आपल्या परिस्थितीप्रमाणे मोठ्या प्रेमळपणे आदरातिथ्य केले. जेवण झाल्यानंतर ते गप्पागोष्टी करीत बसले असता अकस्मात मृदंगाचा आवाज ऐकू येऊ लागला. तो आवाज ऐकून वसुदत्तेला आपल्या पतीचे स्मरण झाले. आणि ती कष्टी होऊन वररुचीला म्हणाली, 'बाळा, तुझ्या पित्याचा नंद नावाचा मित्र नृत्य करीत आहे. त्याच्याच मृदंगाचा आवाज आपणास ऐकू येत आहे.' असे आपल्या आईचे शब्द ऐकून वररुची तिला म्हणाला, 'आई, मला ते नृत्य पाहण्यास जाण्याची आज्ञा दे. म्हणजे ते पाहून आल्यावर मी तुला ते अगदी जसेच्या तसे करून दाखवीन.'

असे वररुचीचे शब्द ऐकताच तेथे असणाऱ्या दोन प्रवाशांना मोठे आश्चर्य वाटले. ही गोष्ट वसुदत्तेच्या लक्षात येताच ती त्यांना म्हणाली, 'बाबांनो, तो खरे तेच बोलत आहे. वररुची एकपाठी आहे. आणि त्याची धारणाशक्ती असामान्य आहे.' ते ऐकून विस्मित झालेल्या वररुचीची परीक्षा

पाहण्याकरिता त्या दोघा प्रवाशांनी एका संस्कृत ग्रंथातील काही उतारे मोठ्यांदा म्हटले, ते ऐकून वररुचीने अगदी तसेच ते पुन्हा म्हणून दाखविले. तेव्हा ते दोघे पाहुणे फार आनंदित झाले. नंतर वररुचि त्यांच्या बरोबर नंदाचे नृत्य पाहण्यास गेला. त्याने ते नृत्य लक्षपूर्वक पाहिले. आणि घरी परत आल्यावर आपल्या आईला ते अगदी हुबेहूब करून दाखविले. तेव्हा सर्वांना मोठ्या आश्चर्याबरोबर आनंदहि वाटला.

वसुदत्तेच्या घरी आलेले ते दोन पाहुणे चुलत भाऊ होते. त्यापैकी एकाचे नाव होते व्याडी व दुसऱ्याचे नाव होते इंद्रदत्त. लहानपणीच ते दोघेही आपल्या आई-वडिलांना पारखे झाले होते. त्यांच्या घरची परिस्थिती चांगली होती. त्यांना लहानपणापासून विद्येची फार आवड होती. म्हणून तिज्या प्राप्तीकरिता कार्तिकियाची उपासना करून त्याला प्रसन्न करून घेण्याचे त्यांनी निशिचत केले. त्याप्रमाणे त्यांनी त्याची तपश्चर्या केली. तेव्हा त्यांच्या तपश्चर्येने संतुष्ट झालेल्या कार्तिकियानी त्यांच्या स्वप्नात येऊन त्यांना सांगितले, 'वत्सांनो, तुम्ही पाटलीपुत्र नगरात जा. तेथे वर्ष नावाचा एक विद्वान ब्राह्मण पंडित आहे. त्याच्याकडे जाऊन सर्व विद्यांची प्राप्ती करून घ्या!'

त्याप्रमाणे व्याडी व इंद्रदत्त पाटलीपुत्र नगरात गेले. तेथे त्यांनी वर्षाचार्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. तेव्हा तेथील काही लोक त्यांना म्हणाले, 'या नगरात वर्ष या नावाचा एक मूर्ख ब्राह्मण आहे. त्याच्याकडे जाऊन तुम्हाला विद्या प्राप्त कशी होणार ?' असे त्या लोकांचे बोलणे ऐकून त्या दोघांना वाटले वर्षाचार्य जर तसे असतील तर त्यांच्याकडे जाऊन काय उपयोग ? पण स्वप्नावर विश्वास ठेवून ते दोघे अखेर शोध करीत वर्षाचार्यांच्या घरापाशी आले. ते घर अत्यंत जीर्ण असे होते. त्याच्या भिंतींची पडझड झालेली होती. घराच्या छपरास भोके पडलेली होती. अशा घरात कोणी राहात असेल असे कोणालाही वाटले नसते. घरात जाऊन चौकशी करावी, म्हणून त्यांनी घरात प्रवेश केला. तेव्हा जीर्ण शीर्ण वस्त्र परिधान केलेली एक अत्यंत प्रौढ अशी स्त्री पुढे आली. ती वर्षाचार्यांची पत्नी होती. तिने त्यांची चौकशी केली. तेव्हा त्यांनी आपली सर्व हकीकत आणि नगरांतील लोकांनी काय सांगितले हे दोन्ही

तिला सांगितले. तेव्हा ती त्यांना म्हणाली, 'तुम्ही मला माझ्या मुलासारखे आहात. तेव्हा खरी गोष्ट काय आहे ती तुम्हाला सांगते. ती ऐका.'

"या नगरातील स्त्रिया गूळ व पीठ यांचे लाडू करून ते दक्षिणेसह मूर्ख ब्राह्मणाला देण्याचे एक व्रत करतात. त्यामुळे थंडीची व उन्हाची बाधा होत नाही त्यांची समजूत आहे. माझ्या जावेने माझ्या पतीला असेच दान दिले. त्यामुळे मी त्यांच्यावर फार  संतापले. आपल्या हातून मूर्खपणा झाला, असे वाटून ते दुःखित झाले. तेव्हा विद्यावंत होण्यासाठी त्यांनी कार्तिक स्वामींची एकनिष्ठेने भक्ती केली. त्यामुळे संतुष्ट झालेल्या कार्तिक स्वामींनी त्यांना सर्व विद्या सांगितल्या. आणि त्या विद्या एकपाठी असा जो शिष्य मिळेल त्याला शिकविण्याची आज्ञा केली. तेव्हा पासून माझे पती त्या शिष्याची वाट बघत ध्यानात मग्न होऊन राहिले आहेत. तेव्हा तुम्ही एकपाठी असणाऱ्या मुलाला इथं घेऊन या. म्हणजे त्याच्याबरोबर तुम्हालाही सर्व विद्या प्राप्त होतील." असे वर्षाचार्यांच्या पत्नीचे बोलणे ऐकून त्यांना गुरुप्राप्ती झाली म्हणून खूप आनंद झाला. गुरुजींच्या घरचे दारिद्र्य पाहून त्यानी शंभर मोहोरा गुरुपत्नींच्या हाती दिल्या आणि ते एकपाठी विद्यार्थ्यांचा शोध करीत सर्व पृथ्वीभर भटकत राहिले आणि योगायोगाने वसुदत्तेच्या घरी मुक्कामास आले.

आपली कथा व्याडी व इंद्रदत्त यांनी वसुदत्तेला सांगितली व वररुची एकपाठी असल्याने त्याला आपल्या स्वाधीन करण्याची त्यांनी तिची प्रार्थना केली. तेव्हा वसुदत्ता त्यांना म्हणाली, '"तुमचं सांगणं सत्य आहे, अशी माझी खात्री झाली आहे. कारण या मुलाचे जन्मकाळी अशी आकाशवाणी झाली की, 'हा श्रुतधर' आहे. आणि त्याला वर्षाचार्यापासून विद्या प्राप्त होईल. याचं नाव वररुचि असं ठेवा. कारण इहलोकी जे श्रेष्ठ असेल तेच याला आवडेल.' त्याप्रमाणे याला वर्षाचार्याकडे पाठवावे असे माझ्या मनात होतेच. पण त्यांचा शोध कुठं करायचा ते माहित नसल्याने मी स्वस्थ राहिले होते. आता तुमची हकीकत ऐकून माझी चिंता दूर होऊन मला बरे वाटले. तुम्ही त्याला तुमच्या बरोबर वर्षाचार्यांकडे घेऊन जा."

असे वसुदत्तेचे शब्द ऐकून व्याडी व इंद्रदत्त यांना खूप आनंद झाला. दुसऱ्या दिवशी वररुचीला वेदाभ्यास करण्यास योग्यता यावी म्हणून व्याडीने स्वखर्चाने त्याची मुंज केली. नंतर व्याडी व इंद्रदत्ताने खर्चाकरिता बरेच द्रव्य वसुदत्तेच्या स्वाधीन केले. आपल्या एकुलत्या एका मुलाला निरोप देताना वसुदत्तेला फार वाईट वाटले. पण तो विद्यावंत व धनवंत होण्यासाठी त्याचा वियोग आपणास सहन केला पाहिजे, अशी तिने आपल्या मनाची समजूत करून घेतली.

यथावकाश प्रवास करून व्याडी, इंद्रदत्त व वररुचि पाटलीपुत्र नगरातील वर्षाचार्यांच्या घरी पोहोचले. तेथे गेल्यावर त्यांनी वर्षाचार्यांना वंदन केले. वर्षाचार्यांनीही त्यांची अगत्यपूर्वक चौकशी केली. दुसऱ्या दिवसापासून त्यांच्या वेदाध्ययनास सुरुवात झाली. वर्षाचार्यांनी प्रथम आपल्या दिव्य वाणीने ॐ काराचा उच्चार केला. तत्क्षणी संपूर्ण वेद त्यांच्या मनात जागृत झाले. गुरूने सांगितलेला मंत्र एकदाच ऐकून वररुचि तसाच तो म्हणून दाखवी. तो स्मरणात ठेवण्यासाठी व्याडीला दोनदा एकावा लागे. आणि इंद्रदत्ताला तीनदा एकावा लागे. अशा रीतीने वर्षाचार्यांच्या घरी चाललेल्या वेदपठणाचा आवाज ऐकून नागरिक आश्चर्यचकित झाले. त्यांची वर्षाचार्यांबद्दल झालेली गैर समजूत पार नाहीशी होऊन त्यांनी त्या श्रेष्ठ ब्राह्मणाला वंदन केले. ते वृत्त नंद राजाच्याही कानी गेले. तेव्हा त्याने स्वतः वर्षाचार्यांच्या घरी जाऊन त्यांचे दर्शन घेतले. आणि त्यांना अपार द्रव्य देऊन त्यांची गरीबी समूळ नाहीशी केली.

वर्षाचार्यांकडे राहून अल्पावधीतच इंद्र, व्याडी व वररुचि यांनी सर्व विद्या प्राप्त करून घेतल्या. आता ते तिघेही वयाने मोठे झाले होते. काही दिवसांनी नगरात इंद्रमहोत्सवाला मोठ्या थाटामाटात सुरुवात झाली. त्या महोत्सवात नगरातील बहुसंख्य स्त्री पुरुष मोठ्या उत्साहाने आणि अगत्यपूर्वक सामील झाले होते. अशा त्या उत्सवाची शोभा पाहण्यासाठी वररुची आपल्या मित्रांसह निघाला. तेव्हा समोरून येत असलेली एक सुंदर कन्या वररुचीच्या नजरेस पडली. तिच्या शालीन सौंदर्याने वररुचि मोहित झाला. विद्यासंपन्न

आणि देखण्या वररुचीला पाहून त्या कन्येचे चित्तही त्याच्याकडे आकर्षित झाले. तेव्हा ती स्वरूपसुंदरी कोण, असे वररुचीने इंद्रदत्ताला विचारले. इंद्रदत्त म्हणाला, 'आपल्या आचार्यांचे उपवर्त नावाचे एक बंधू आहेत. त्यांची ती उपकोशा नावाची मुलगी आहे.'

उपकोशेचे दर्शन झाल्यापाहून वररुचीचे मन अस्थिर झाले होते. त्याला वाटले, आता आपले वेदाध्ययन जवळ जवळ संपत आलेलेच आहे. तेव्हा उपकोशा भार्या म्हणून आपणास प्राप्त झाली तर गृहस्थाश्रमात पदार्पण करावे. त्या रात्री त्याला बराच वेळपर्यंत झोप आली नाही. पहाटे जेव्हा त्याचा डोळा लागला, तेव्हा त्याला एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात पांढरेशुभ्र वस्त्र परिधान केलेली एक दिव्य स्त्री त्याला दिसली. ती त्याला म्हणाली, 'वत्सा, उपकोशा ही पूर्वजन्मीची तुझी भार्याच आहे. ती तुझ्यावाचून दुसऱ्या कोणाशीही लग्न करणार नाही. तू निश्चिंत रहा. मी नित्य तुझ्या देहात वास्तव्य करून असणारी सरस्वती आहे.' असे देवीचे शब्द ऐकून वररुचीची चिंता नाहीशी झाली. आणि तो आनंदित झाला.

नंतर दुसऱ्या दिवशी वररुचि उपकोशेच्या दर्शनार्थ तिच्या घरासमोर असलेल्या एका बागेतील एका झाडाखाली जाऊन उभा राहिला. उपकोशेने तिथे आलेल्या त्याला पाहताच आपल्या एका सखीला 'मी आपणासच वरणार आहे' असा निरोप देऊन पाठविले. तेव्हा हर्षित झालेल्या वररुचीने वडीलमाणसांच्या संमतीनेच हा विवाह व्हावा असे त्या सखीला सांगितले. तेव्हा तिने ती गोष्ट उपकोशेच्या आईला सांगितली. तिने ती आपल्या पतीच्या कानावर घातली. त्याने ती वर्षाचार्यांना सांगितली. वर्षाचार्यांनी त्या विवाहास मोठ्या आनंदाने संमती देताच विवाह मुहूर्त निश्चित झाला. व्याडीने कौशांबीला जाऊन वसुदत्तेला आणले. नंतर मोठ्या थाटामाटात वररुचीचा उपकोशेशी विवाह साजरा झाला. नंतर वररुचि आपली आई व पत्नी यांच्यासह पाटलीपुत्र नगरात मोठ्या आनंदाने राहू लागला.

वेदविद्या पारंगत म्हणून वर्षाचार्यांची ख्याती आता सर्वत्र पसरली

होती. त्यामुळे त्यांच्याकडे पुष्कळ विद्यार्थी वेदविद्या शिकण्यासाठी येऊ लागले. त्यामध्ये पाणिनी नावाचा एक मंद बुद्धीचा विद्यार्थी होता. वेदाभ्यासात त्याचे लक्ष नव्हते. आणि गुरू व गुरुपत्नी यांची तो मन लावून सेवा करीत नसे. म्हणून गुरुपत्नीने त्याला हाकलून दिले. त्या गोष्टीचा अपमान वाटून पाणिनी सरळ हिमालयात गेला. त्याने शंकराची कडक तपश्चर्या करून त्यांना प्रसन्न करून घेतले. शंकराने त्याला व्याकरण शास्त्राचे ज्ञान दिले. नंतर पाणिनी पाटलीपुत्र नगरात परत आला. आणि आपणास लाभलेल्या व्याकरणशास्त्राच्या बळावर त्याने वररुचीला वादविवादाकरिता आव्हान दिले. तो वादविवाद सात दिवस चालला. त्यात आठव्या दिवशी वररुचीने पाणिनीला जिंकले. पण त्याचवेळी त्यांचा वादविवाद ऐकणाऱ्या शंकरांनी एक मोठा हुंकार दिला. त्यामुळे वररुचीने रूढ केलेले ऐंद्र व्याकरण नष्ट झाले आणि वररुचि व इतर पंडित मंडळी मूर्ख समजली जाऊ लागली. परिणामी पाणिनीच विजयी ठरला.

वादात आपला पराजय झाला म्हणून वररुचि फार खिन्न झाला. तो मानी असल्याने त्याला अपमान असह्य झाला. आता हिमालयात जाऊन कडक तपश्चर्येने शंकरांना प्रसन्न करून घ्यावे असा त्याने विचार केला. आपल्यामागे गृहस्थिती ठीक रहावी, म्हणून त्याने बरेच द्रव्य घरच्या खर्चासाठी म्हणून आपल्या हिरण्यगुप्त नावाच्या एका वाणी मित्राकडे देऊन ठेवले. द्रव्याची जशी जरूरी लागेल तसे ते तू हिरण्यगुप्ताकडून घे असे उपकोशेला सांगून तो हिमालयाकडे निघून गेला.

आपल्या पतीची तपश्चर्या लवकर फलद्रूप व्हावी म्हणून उपकोशा व्रतस्थ राहू लागली. ती दररोज स्नानासाठी गंगेवर जाऊ लागली. तिकडे वररुचीच्या कडक तपश्चर्येने शंकर संतुष्ट झाले आणि त्यांनी, त्याला पाणिनीला सांगितलेले व्याकरणशास्त्र प्रदान केले. नंतर अतिशय आनंदित झालेला वररुचि आपल्या घरी परत आला. त्याला पाहून त्याच्या आईला व पत्नीला फार आनंद झाला. वर्षाचार्यांना वररुचीच्या तोंडून नवीन व्याकरणशास्त्र ऐकण्याची इच्छा झाली. पण कार्तिक स्वामींनी त्यांना ते ऐकवून त्यांची इच्छा पुरी केली.

नंतर काही दिवसानी विद्याभ्यास पूर्ण झाल्यामुळे व्याडी व इंद्रदत्त यांनी वर्षाचार्यांना गुरुदक्षिणेबाबत विचारले. तेव्हा त्यांनी गुरुदक्षिणा म्हणून एक कोटी सुवर्णमुद्रा मागितल्या. एवढी मोठी संपत्ती त्यांच्याजवळ असणे शक्यच नव्हते. गुरूने मागितलेली गुरुदक्षिणा देणे तर आवश्यक होते. नाहीतर प्राप्त केलेली सर्व विद्या नष्ट होण्याची भीती होती. तेव्हा व्याडी व इंद्रदत्त वररुचीकडे गेले आणि त्याला म्हणाले, "मित्रा, गुरूनी मागितलेली एक कोटी सुवर्णमुद्रांची दक्षिणा आता आपणास राजाच्या साहाय्यावाचून देणे शक्य नाही. तेव्हा तू आमच्याबरोबर नंद राजाकडे चल. तुझ्या पत्नीला त्यांनी भगिनी म्हणून मानले आहेच. तेव्हा आपण त्याच्याकडे जाऊन आपणास आवश्यक तेवढे व्यसाहाय्य करण्याची त्याला विनंती करू."

त्याप्रमाणे ते तिघे राजाची भेट घेण्यास अयोध्या नगरीकडे निघाले. पण राजसाहाय्य मिळविण्याच्या बाबतीत ते दुर्दैवीच ठरले. कारण ते नगरापाशी जाताच राजा मृत्यु पावल्याचे दुःखद वृत्त त्यांच्या कानी पडले, सगळ्या नगरात दुःखाची छाया पसरली होती. त्या दुःखद वार्तेने वररुचि, व्याडी व इंद्रदत्त फार कष्टी झाले. आता काय करावे असा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला. तेव्हा योगविद्येत प्रवीण असलेल्या इंद्रदत्ताच्या मनात एक विलक्षण कल्पना आली. तो आपल्या मित्रांना म्हणाला, "मी योगविद्येच्या साहाय्याने मृत राजाच्या शरीरात प्रवेश करतो. तेव्हा राजा जिवंत झाला, म्हणून सर्व लोक आनंदित होतील. त्याप्रीत्यर्थ राजवाड्यात मोठा दानधर्म सुरू होईल. त्यावेळी वररुचीने माझ्याकडे यावे. आणि मला एक कोटी सुवर्णमुद्रा देण्याची विनंती करावी. त्याप्रमाणे मी लगेच आज्ञा देईन. एवढे कार्य झाले म्हणजे मी माझ्या शरीरात पुन्हा प्रवेश करीन. तोपर्यंत व्याडीने माझ्या शरीराचं मोठ्या काळजीपूर्वक रक्षण करावं."

अशी इंद्रदत्ताची विलक्षण कल्पना त्याच्या मित्रांना पसंत पडली. तेव्हा एकही क्षण वाया न घालविता इंद्रदत्ताने मृत राजाच्या शरीरात प्रवेश केला. त्याबरोबर राजाच्या शरीराचे चलनवलन सुरू होऊन त्याने आपले डोळे उघडले.

राजा पुन्हा जिवंत झाला, म्हणून सगळे लोक आनंदाने नाचू लागले. नगरांत आनंदाचा महोत्सव साजरा होऊ लागला. राजवाड्यात दानधर्माला भरती आली. व्याडी इंद्रदत्ताच्या निर्जीव शरीराचे रक्षण करीत राहिला. आणि वररुचि राजवाड्यात गेला. ठरल्याप्रमाणे त्याने राजाकडे एक कोटी सवर्णमुद्रा दान म्हणून मिळण्याची विनंती केली. ती राजाने तत्काळ मान्य करून आपल्या शकटाल नावाच्या मंत्र्याला वररुचीला एक कोटी सुवर्णमुद्रा देण्याची आज्ञा केली.

तेव्हा, "ठीक आहे महाराज, जशी आपली आज्ञा!" असे म्हणून त्या चाणाक्ष व धूर्त शकटालाच्या मनात असा विचार आला की, "राजाचा पुनर्जन्म होताच त्याच्याकडे लगेच एक ब्राह्मण येतो. एक कोटी सुवर्णमुद्रा मागतो. आणि लगेच राजा मुळीच विचार न करता त्याची मागणी मान्य करून तशी आज्ञा देतो. ही घटनाच मोठी संशयास्पद आहे. यावेळी राजपुत्र वयाने लहान आहे. आणि राजाच्या शत्रूंनी तर नगरात अस्वस्थता निर्माण केली आहे. म्हणून पुनर्जन्म मिळालेल्या राजाच्या शरीराचे आता आपण मोठे काळजीपूर्वक रक्षण केले पाहिजे."

असा विचार करून शकटालाने आपल्या सेवकांना अशी आज्ञा दिली की, अयोध्या नगराबाहेर असलेली मृत शरीरे तत्काळ दहन करून टाका. त्याप्रमाणे ते सेवक करीत असता त्यांनी व्याडी रक्षण करीत असलेल्या इंद्रदत्ताचे शरीरही जाळून टाकले. इकडे राजाने वररुचीस एक कोटी सुवर्णमुद्रा देण्याची शकटालास निकड लावली होती. पण शकटाल या ना त्या कारणाने त्या कार्यास विलंब लावीत होता. तेवढ्यात व्याडी 'हाय, हाय, फार मोठा अन्याय झाला!' असा मोठ्यांदा आक्रोश करीत योगानंदाच्या राजसभेत आला. आणि म्हणाला, "महाराज; समाधी लावून बसलेल्या माझ्या मित्राला तो निर्जीव आहे असे समजून शकटालाने मी नको म्हणत असताना सुद्धा जाळून टाकले." ते दुःखद वृत्त ऐकून योगनंदाच्या शरीरात प्रवेशलेला इंद्रदत्त फार कष्टी झाला. ते चाणाक्ष शकटालाच्या लक्षात येताच तो मनात म्हणाला,

क्र. २९०९ 391320 ता. ०१७.०१.

'बरं झालं, आता राजाच्या देहातील आत्मा तें शरीर सोडून जाणार नाही!' नंतर शकटालाने वररुचीला राजाज्ञेप्रमाणे एक कोटी सुवर्णमुद्रांचे दान दिले.

धूर्त शकटालाने इंद्रदत्ताच्या शरीराचा नाश केल्यामुळे राजाच्या शरीरात प्रवेशलेल्या इंद्रदत्ताला आता नाइलाजाने राजा म्हणूनच राहणे भाग पडले. त्यामुळे त्याला फार दुःख झाले. त्याने आपला मित्र व्याडी याला बोलावून घेतले. आणि मोठ्या दुःखाने तो व्याडीला म्हणाला, ''मित्रा, ब्राह्मण कुळात जन्म घेऊन मला आता शूद्र राजाचा देह धारण करूनच जगले पाहिजे. हे राजवैभव मला सुख देण्यास समर्थ नाही.'' तेव्हा व्याडी त्याचे समाधान करीत त्याला म्हणाला, 'मित्रा, झाले ते झाले. आता दुःख करण्यात काही अर्थ नाही. महामंत्री शकटाल मोठा धूर्त आहे. त्याला आपले कारस्थान समजले असावे. तू त्याच्यापासून नेहमीच सावध रहा. कारण कदाचित शकटाल तुझा घात करून राजपुत्र चंद्रगुप्तास राजा करील. तेव्हा मला असं वाटतं की तू वररुचीला आपला महामंत्री कर. म्हणजे तो आपल्या दिलय बुद्धिमत्तेच्या बळावर तुझे राज्य योग्य रीतीने चालवील!'' असा हितकारक सल्ला योगानंदाला देऊन व्याडी वररुचीने आणून दिलेली गुरुदक्षिणा वर्षाचार्यांना अर्पण करण्यासाठी म्हणून निघून गेला.

व्याडीचे हितकारक बोलणे राजाला पसंत पडले होते. त्याप्रमाणे त्याने वररुचीला तत्काळ बोलावून घेतले. आणि त्यास महामंत्रीपद दिले. शकटाल जिवंत असेपर्यंत आपल्या राज्यासच नव्हे तर जिवालाही धोका आहे, ह्याची जाणीव राजा व वररुची या दोघांनाही होती. तेव्हा शकटालाला दूर करणे आवश्यक होते. त्यासाठी एका जिवंत ब्राह्मणाला शकटालाने जाळून मारले, असा राजाने शकटालावर आरोप ठेवला. आणि त्या अपराधाबद्दल शिक्षा म्हणून त्याला त्याच्या शंभर मुलांसह एका कोरड्या व अंधाऱ्या विहिरीत टाकून दिले. ते जिवंत रहावेत म्हणून त्यांना दररोज एक गाडगेभर सातु आणि एक गाडगेभर पाणी देण्याची राजाने आज्ञा दिली.

राजाने आपल्यावर फार मोठा अन्याय केला आहे, म्हणून शकटाल

फार संतापला. या अन्यायी राजाचा सूड घ्यावा अशी प्रबल इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली. तो आपल्या मुलांना म्हणाला, "बाळांनो, आपण मोठ्या प्राणसंकटात आहोत. आपणास मिळणाऱ्या सातू व पाणी याच्यावर फक्त एकच माणूस कसातरी जिवंत राहू शकेल. तेव्हा तुमच्यापैकी जो योगानंदाचा सूड घेण्यास समर्थ असेल त्यानेच मिळणाऱ्या सातूवर आणि जलावर आपला उदरनिर्वाह करून जिवंत रहावे!"

असे आपल्या पित्याचे निश्चयी शब्द ऐकून आपणच त्या कार्याची जबाबदारी घ्यावी असे सर्व मुलांनी त्याला सांगितले. त्याप्रमाणे मोठ्या कष्टाने शकटाल दररोज मिळणाऱ्या अन्न पाण्यावर कसेबसे जगण्याचा प्रयत्न करू लागला. आणि त्याची मुले अन्न पाण्यावाचून त्याज्च्या डोळ्यादेखत तडफडून मरण पावू लागली. ते महाभयंकर दुःख सहन करीत केवळ सूडाच्या भावनेने प्रेरित झालेला शकटाल घशाखाली मोठ्या कष्टाने उतरणाऱ्या थोड्याशा अन्नपाण्यानेच जिवंत राहण्याचा प्रयत्न करू लागला. अखेर त्याचे शंभर मुलगे त्याच्या समक्ष क्षुधा व तृषा यांनी व्याकुळ होऊन पंचत्व पावले. आणि त्यांच्या निर्जीव देहांनी वेढलेला बिचारा असहाय शकटाल एकटाच जिवंत राहिला.

काही दिवसांनी वर्षाचार्यांना गुरुदक्षिणा अर्पण करून परत आलेल्या व्याडीने आपला मित्र इंद्रदत्त याची म्हणजेच राजाची भेट घेतली. तेव्हा राजाने त्याला आपल्या नगरांत राहण्याची विनंती केली. पण व्याडी त्याला म्हणाला, "राजन्, हे शरीर विनाशी आहे. आणि सर्व सुखोपभोग मिथ्या आहेत. कोणीही बुद्धिमान मनुष्य त्यामध्ये निमग्न होऊन राहात नाही. मृगजळासारखी चंचल असलेली लक्ष्मी बुद्धिमंतास मोहित करू शकत नाही." असे म्हणून व्याडी आपले उर्वरित आयुष्य केवळ तपश्चर्येत घालविण्यासाठी वनाकडे निघून गेला.

पुढे योगानंद वररुचि व आपल्या सर्व परिवारासह अयोध्येहून आपल्या पाटलीपुत्र नावाच्या राजनगरीत परत आला. तेथे नाना प्रकारची सुखे अनुभवीत तो आपला राज्यकारभार पाहू लागला. वररुचीहि देवी सरस्वतीच्या कृपाप्रसादाने आपले कर्तव्य उत्कृष्ट रीतीने पार पाडीत होता. पत्नी, माता व

गुरु यांच्या प्रेमळ सहवासात तोही मोठ्या सुखात व आनंदात काळ कंठू लागला.

अशा प्रकारे काही काळ निघून गेल्यावर योगानंद केवळ सुखभोगातच मग्न होऊन राहिल्यामुळे त्याचे राज्यकारभाराकडे दुर्लक्ष झाले. सत्ता आणि संपत्तीच्या बळावर तो मन मानेल तसे वागू लागला. तेव्हा वररुचीला चिंता वाटू लागली. त्याने विचार केला, 'मदांध झालेल्या राजाचे राज्यकारभाराकडे लक्ष नाही. त्याला आवरून राज्यकारभाराचे काम करणे आता फार कठीण झाले आहे. अशा वेळी आपणास एखाद्या बुद्धिमान मित्राचे साहाय्य झाले तर फार बरे होईल.' असा विचार करीत असताच त्याला शकटालाचे स्मरण झाले. त्याला विहिरीतून बाहेर काढले तर त्याचे चांगले साहाय्य होईल असे त्याला वाटले. पण शकटाल आता त्या विहिरीत जिवंत असेल का ? अशी शंका त्याला आली. पण खरे काय आहे ते पहावे आणि खात्री करून घ्यावी, अशा विचाराने त्याने राजाची आज्ञा घेऊन विहिरीत दोर सोडला. तो दोर धरून शकटालच स्वतः वर आला. प्राणदात्या वररुचीबद्दल आता त्याला मोठा स्नेह वाटू लागला, परंतु जोपर्यंत तो महामंत्री आहे तोपर्यंत आपण योग्य त्या संधीची वाट पहात त्याच्या मनाप्रमाणे वागावे असा शकटालाने आपल्या मनाशी विचार केला.

एके दिवशी नगरातून बाहेर पडलेला योगानंद गंगेच्या काठाने फिरत जात असता त्याला नदीच्या प्रवाहात ज्याची बोटे एकमेकास चिकटली आहेत असा एक हात दिसला. त्या गोष्टीचा त्याला मोठा चमत्कार वाटला, म्हणून त्याने वररुचीला बोलावून घेऊन त्याला ते दृश्य दाखविले. तेव्हा वररुचीने तत्काळ जिकडे तो हात दिसत होता तिकडे आपल्या हाताची दोन बोटे दाखविली त्याबरोबर तो हात दिसेनासा झाला. तेव्हा आश्चर्यचकित झालेल्या राजाने वररुचीला त्याचे कारण विचारले. तेव्हा वररुची त्याला म्हांला, "राजन्, त्या हाताने आपली बोटे जुळलेली अशी दाखविली त्याचा अर्थ म्हणजे ज्यांचे एकमत झाले आहे अशा पाच व्यक्तींना या जगात अशक्य असे काय आहे? पण ज्यांचे चित्त एक झालेले आहे, त्या दोघांनाही या जगात साध्य करून

घेण्यास अशक्य असे काहीच नाही. अशा अर्थाने मी आपल्या हाताची दोन बोटे त्या हाताला दाखविताच तो एकदम नाहीसा झाला.'' असे वररुचीचे शब्द ऐकून वररुची रहस्यज्ञानी आहे अशी राजाची खात्री पटली आणि त्याला फार आनंद झाला.

पुढे काही दिवसांनी दानाच्या इच्छेने एक ब्राह्मण अतिथी राजवाड्यात आला, तेथील प्रशस्त अंगणात थांबून त्याने राणीच्या महालाकडे पाहिले. त्याच वेळी राणीही त्याच्याकडे पाहात आहे असे राजा योगानंदाला दिसले. तेव्हा विनाकारण संशयग्रस्त झालेल्या राजाने संतापून त्या ब्राह्मणास अविचाराने ठार मारण्याची आज्ञा केली. तेव्हा प्राणसंकटात पडलेल्या त्या अतिथीने आक्रोश करीत आपले म्हणणे ऐकून घेण्याबद्दल राजाची खूप विनवणी केली. पण निर्दयी राजाला त्याची दया आली नाही.

राजाज्ञेप्रमाणे राजसेवक त्या ब्राह्मणाला वधस्थानाकडे घेऊन निघाले. ते बाजारपेठेतून जात असता एका मासे विक्रीच्या दुकानांत टांगून ठेवलेला एक मोठा मासा मोठ्यांदा हसला. तेव्हा तो अद्भुत चमत्कार पाहून नागरिक आश्चर्यचकित झाले. ती वार्ता तत्काळ राजाच्या कानी गेली. तेव्हा ब्राह्मणाला दिलेली शिक्षा त्याने ताबडतोब स्थगित केली. नंतर त्याने वररुचीला बोलावून घेतले. त्याला सर्व घडलेली हकीकत सांगून अखेर राजा त्याला म्हणाला, 'तो निर्जीव मासा का हसला त्याचे कारण तू मला सांग!' असे राजाचे शब्द ऐकून वररुची म्हणाला, 'राजन्, ही घटना मोठी विलक्षण आहे. तिचा सर्व बाजूंनी विचार करावयास हवा. तेव्हा आपल्या प्रश्नाचे उत्तर मी उद्या सांगेन.'

असे राजाला सांगून वररुची मोठ्या चिंतेतच घरी परतला. मासा हसला याचे कारण काय असावे यासंबंधी तो विचार करीत राहिला. पण त्या प्रश्नाचे उत्तर काही त्याच्या लक्षात येईना. तेव्हा त्याने देवी सरस्वतीची प्रार्थना केली. तेव्हा त्याला दर्शन देऊन ती म्हणाली, 'वत्सा, राजवाड्याजवळच्या बागेत एक ताडाचे झाड आहे. आज रात्री तू त्या झाडावर चढून लपून बस, म्हणजे मेलेला मासा का हसला त्याचे कारण तुला समजेल!'

त्याप्रमाणे वररुची रात्री त्या झाडाकडे गेला. आणि त्यावर चढून काळजीपूर्वक लपून राहिला. थोड्या वेळाने एक भयंकर राक्षशी आपल्या लहान मुलांसह तेथे आली. राक्षसीची मुले फार भुकेलेली होती. म्हणून ती राक्षशीला 'काहीतरी खाण्यास दे' असे म्हणत होती. तेव्हा त्यांची समजूत घालीत ती त्यांना म्हणाली, ''बाळांनो, थोडा वेळ थांबा. आज राजा एका ब्राह्मणाला मारणार होता. पण त्याने त्याला आज मारण्याचे रहित केले आहे. कारण एक मेलेला मासा हसला म्हणून. उद्या सकाळी राजाज्ञेनं त्या ब्राह्मणाला मारले गेले म्हणजे मी तुम्हाला त्याचे मांस खायला देईन.'' तेव्हा राक्षसीच्या मुलांनी तिला विचारले, 'तो मेलेला मासा हसण्याचं कारण काय ?' त्यावर राक्षसी म्हणाली, ''राजाच्या अंतःपुरात जाण्यास पुरुषांना परवानगी नसताना देखील स्त्रीवेषधारी काही पुरुष येथे आहेत. या गोष्टीची राजाला मुळीच कल्पना नाही. आणि भिक्षा मागण्याच्या हेतूने बिचाऱ्या ब्राह्मणाने राणीकडे पाहिले, तर त्या मूर्ख राजाने त्याला वधस्तंभावर चढवण्याची शिक्षा दिली. असे जाणून तो मेलेला मासा हसला.'' असे बोलून ती राक्षसी आपल्या मुलांसह तेथून निघून गेली. ताडाच्या झाडावर बसलेल्या वररुचीने राक्षसीचा शब्द न् शब्द ऐकला होता. राक्षसी आपल्या मुलासह तेथून निघून गेल्यानंतर तो झाडावरून खाली उतरला. आणि आपल्या घरी जाऊन निश्चिंत मनाने झोपी गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने राजाची भेट घेतली. व मासा का हसला त्याचे कारण त्याला सांगितले. ते कानी पडताच राजाला फार राग आला. त्याने लगेच त्या दृष्टीने अंतःपुरात तपास करण्याची आज्ञा केली. तेव्हा खरोखरच तिथे काही स्त्रीवेषधारी पुरुष सापडले. राजाने त्यांना मृत्यूची शिक्षा दिली. ब्राह्मणाला बंधमुक्त केले. आणि वररुचीच्या अगाध बुद्धिमत्तेची मुक्त कंठाने प्रशंसा केली.

एके दिवशी एक उत्तम चित्रकार नगरात आला. त्याने राजाची भेट घेतली. तेव्हा राजाने त्याला आपले स्वतःचे व महाराणीचे अशी दोन भव्य चित्रे काढण्यास आज्ञा केली. ती चित्रे त्या चित्रकाराने आपल्या कलाकौशल्याने इतकी हुबेहूब काढली की ती पाहताच जणू काही आपणासमोर प्रत्यक्ष राजा

आणि राणी आहेत असे वाटावे. अशी चित्रे त्या चित्रकाराने राजाला भेट म्हणून दिली. तेव्हा संतुष्ट झालेल्या त्या राजाने चित्रकाराला मोठे बक्षीस देऊन त्याचा गौरव केला. चित्रकार निघून गेल्यावर राजाने ती चित्रे आपल्या खास महालात लावण्याची आज्ञा केली.

एकदा दैवयोगाने वररुची काही कामानिमित्त त्या महालात आला असता स्वरूपसुंदर महाराणीचे चित्र त्याच्या नजरेस पडले. ते त्याने बारकाईने निरखून पाहिले. तेव्हा महाराणीच्या सौंदर्य रूप गुणादि लक्षणास पूरक म्हणून तिच्या हनुवटीवर तीळ असल्यास चांगले, असे वाटून त्या महालातून जाताना त्याने त्या चित्रातल्या राणीच्या हनुवटीवर एक बारीक तीळ काढला. आणि थोडे थांबून राजाची भेट होत नाही असे दिसताच तो तेथून निघून गेला.

वररुची निघून गेल्यानंतर राजा तेथे आला. त्याची नजर राणीच्या चित्राकडे जाताच हनुवटीवरील तिळाने त्या चित्रात झालेला फरक त्यास दिसून आला. तेव्हा त्याने त्याबद्दल आपल्या सेवकास विचारले. ते कृत्य वररुचीचे आहे, असे सेवकाने सांगताच राज्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्याच्या मनात विचार आला, 'राणीच्या शरीरावरील तिळाचे ज्ञान वररुचीला कसे माहित झाले?' या विचाराने राजा संशयग्रस्त झाला. त्याला वाटले, 'स्त्रीवेषधारी पुरुष अंतःपुरात आहेत, हे वररुचीनेच आपणास सांगितले. तेव्हा त्याचीही तेथे ये जा असावी.' विनाशकाल जवळ आला म्हणजे माणसाची बुद्धी विपरीत होते. तसे राजाचे झाले. वररुची आपला हितचिंतक असा परममित्र आहे, ही गोष्ट संशयाने झपाटलेला राजा विसरून गेला. त्याने शकटालाला बोलावून घेतले. आणि गुप्तपणे त्याला सांगितले, 'तू कोणाला काहीही न कळविता वररुचीला ठार मारून टाका!'

अशी राजाची विलक्षण आज्ञा ऐकून शकटाल चिंताग्रस्त झाला. आता काय करावे हे त्याला सुचेना. वररुची ब्राह्मण आहे. तो दिव्य शक्तीने युक्त आहे. शिवाय सर्वात महत्वाचे म्हणजे त्याने आपणास जीवदान दिले आहे. म्हणून त्याला ठार न करता आपणच त्याचे रक्षण केले पाहिजे. अशा विचाराने

शकटालाने आपल्या मनाशी एक योजना ठरविली. नंतर त्याने वररुचीला राजाज्ञा सांगितली. तेव्हा वररुचीला फार वाईट वाटले. आणि तो विचारात पडला. तेव्हा शकटाल त्याला म्हणाला, "मित्रा, राजा तुझ्यावर विनाकारण संतापला आहे. त्याने मला केलेल्या आज्ञेची मी पूर्तता करणार नाही. तू गुप्तपणे माझ्या घरीच रहा. मी दुसऱ्या कोणातरी गुन्हेगाराला मारून तुलाच मारून टाकले असे राजाला सांगतो. अशा रीतीने तू केलेल्या उपकाराची फेड करण्याची संधी मला मिळत आहे तेव्हा माझी विनंती तू ऐक."

असे शकटालाचे बोलणे ऐकून वररुची त्याला म्हणाला, "मित्रा, मला न मारण्याचा तुझा विचार तुझ्यासारख्या महामंत्र्याला साजेसाच आहे. कृतज्ञतेची जाणीव ठेवणारा तू खरा मित्र आहेस. तुला खरे तेच सांगतो की, मला कोणीही मारू शकणार नाही. कारण एक राक्षस माझा मित्र आहे. मी त्याचे स्मरण करताच एकदम तो माझ्यापुढे प्रगट होतो. तो ऐवढा महापराक्रमी आहे की, मी सांगितले तर तो सगळ्या विश्वाचा ग्रास करून टाकील. अशा माझ्या राक्षस मित्राच्या साह्याने मी योगानंद राजाचा केव्हाच नाश करून टाकला असता. पण राजा म्हणजेच माझा इंद्रदत्त नावाचा ब्राह्मण मित्र आहे. त्याचा घात मी करणार नाही. कृतघ्न होऊन मला मारून टाकण्याची त्याने तुला आज्ञा केली. तरी मित्रहत्येचे पातक मी करणार नाही!"

असे उदार हृदयाच्या वररुचीचे शब्द ऐकून शकटाल वररुचीचा राक्षस मित्र पाहण्यास उत्सुक झाला. व त्याने तशी वररुचीला विनंती केली. तेव्हा वररुचीने डोळे मिटून आपल्या राक्षस मित्राचे स्मरण केले. तो काय आश्चर्य! एकाएकी एक भयंकर प्रचंड राक्षस त्यांच्यासमोर प्रकट झाला. त्याला पाहून शकटाल आश्चर्याने स्तंभित तर झालाच पण भीतीनेही त्याची घाबरगुंडी उडाली. काही क्षणांनी वररुचीने त्या राक्षसाला गुप्त होण्याची आज्ञा देताच तो राक्षस गुप्त झाला. तेव्हा शकटालाला धीर आला व वररुची दिव्य शक्ति लाभलेला असा एक महात्मा आहे, अशी त्याची खात्री झाली.

शकटालाने वररुचीला विचारली, 'हा भयंकर राक्षस तुझा मित्र कसा

झाला ?' तेव्हा वररुची म्हणाला, "पूर्वी, या नगराचे रात्रीच्या वेळी रक्षण करणारा नगररक्षक नगरातून फिरत असता एकाएकी नाहीसा झाला. दुसऱ्या दिवशी त्याच्या जागेवर आलेल्या नगररक्षकाचीही तशीच गत झाली. असे बरेच नगररक्षक एकएकी नाहीसे झाले. ती वार्ता राजाच्या कानी जाताच त्याला त्या गोष्टीचे मोठे आश्चर्य वाटले तेव्हा त्याने माझ्याकडे नगररक्षणाची कामगिरी दिली. त्या प्रमाणे रात्रीच्या वेळी मी नगरातून फेरफटका मारीत असताना एकाएकी एक महाभयंकर राक्षस माझ्या कडे येत असलेला मला दिसला. तो आता एका क्षणाचाही विलंब न लावता मला खाऊन टाकणार असे मला वाटले. पण तसे काही झाले नाही. तो राक्षस माझ्याजवळ आला आणि मला म्हणाला, 'माझा एक प्रश्न आहे. त्या प्रश्नाचे तू समाधानकारक उत्तर दिलेस तर मी तुझा सेवक होईन. त्या प्रश्नाचे तसे उत्तर दिले नाहीस, तर मात्र मी तुला खाऊन टाकीन.' तेव्हा मी मोठ्या धैर्याने त्या राक्षसाला 'तुझा प्रश्न सांग' असे म्हटले. त्याने प्रश्न केला, 'या नगरांत अतिशय सुंदर अशी कोणती स्त्री आहे ?' असा त्याचा प्रश्न ऐकून मी म्हटले, 'अरे, ज्याला जी स्त्री आवडते ती स्त्री त्याच्या दृष्टीने त्याला अतिशय सुंदर वाटते !' असे माझे अचूक उत्तर ऐकताच राक्षसाचे समाधान झाले. तो म्हणाला, 'माझ्या प्रश्नाचे बरोबर उत्तर देणारा फक्त तूच आज मला भेटलास. यापूर्वी कोणीही या प्रश्नाचे उत्तर देऊ शकले नाही. मी आता तुझा मित्र झालो आहे. यापुढे तू माझे जेव्हा स्मरण करशील तेव्हा मी तुझ्यापुढे प्रकट होऊन तुझी इच्छापूर्ती करीन.' असे सांगून तो राक्षस दुसऱ्या क्षणी अदृश्य झाला." अशी वररुचीने सांगितलेली हकीकत ऐकून शकटालाला त्याच्या बुद्धिचातुर्याचे मोठे कौतुक वाटले. नंतर शकटालाने वररुचीला गुप्तपणे आपल्या घरी ठेवून घेतले. पण त्याचा आपण वध केला असे खोटेच वृत्त राजास सांगून ते तसेच नगरास प्रसृतही केले.

एकेकाळी महामंत्री असलेल्या वररुचीला एकांतवासात राहण्याचा पुढे पुढे खूप कंटाळा आला. अशा परिस्थितीत एके दिवशी तो खिन्न होऊन बसला असता शकटाल त्याला धीर देत म्हणाला, "मित्रा, येऊ नयेत ते दिवस आले आहेत. पण तेही निघून जातील. तू सर्व जाणणारा आहेस तेव्हा व्यर्थ

चिंता का करतोस ? राजे लोक अविचारी असतात. आपण केलेल्या अविचारी कृत्याचा त्यांना केव्हा ना केव्हा तरी पश्चात्ताप होत असतो. तसाच एखादा प्रसंग योगानंद राजाच्या बाबतीत उत्पन्न होईल. आणि तुझी या एकांतवासातून सन्मानाने सुटका होईल." असे शकटालाचे उत्साहवर्धक शब्द ऐकून वररुचीला धीर आला. आणि अनुकूल संधीची वाट पहात तो स्वस्थपणे राहिला.

पुढे एके दिवशी योगानंदाचा हिरण्यगुप्त नावाचा मुलगा शिकारीसाठी एकटाच एका घनदाट अशा अरण्यात गेला. शिकारीचा पाठलाग करताना त्याच्या घोड्याने त्याला एवढे दूर नेले की परत येताना त्या वनातच त्या राजपुत्राला संध्याकाळने गाठले. तेव्हा त्या घनदाट अरण्यातून पुढे जाण्याचा धोका पत्करण्यापेक्षा ती रात्र त्या अरण्यातच घालवावी असे त्याने ठरविले. त्याप्रमाणे त्याने आपल्या घोड्याला जवळपासच्या गवतावर चरण्यास सोडून दिले. आणि तो स्वतः एका उंच झाडावर चढून त्याच्या दुबेळक्यात स्वस्थ बसून राहिला.

काही वेळाने सिंह मागे लागल्यामुळे जिवाच्या भीतीने घाबरलेले एक अस्वल धापा टाकीत त्या झाडाजवळ आले. आणि दुसऱ्याच क्षणी ते झाडावर चढू लागले. त्या अस्वलाला पाहून भ्यालेला राजपुत्र फांदीवरून पुढे सरकू लागला. तेव्हा ते अस्वल मनुष्यवाणीने त्याला म्हणाले, "घाबरू नकोस. सध्या आपण दोघेही प्राणसंकटात आहोत. तू माझ्याबद्दल मुळीच भीती न बाळगता निश्चिंतपणे झोपी जा, मी तुझा मुळीच घात करणार नाही. मी तुझा मित्र आहे." असे त्या अस्वलाचे विश्वासपूर्ण शब्द ऐकून हिरण्यगुप्ताला धीर आला. आणि तो झाडावरच झोपला. अस्वल मात्र जागे राहिले होते.

थोड्या वेळाने अस्वलाच्या पाठीमागे लागलेला सिंह त्या झाडाजवळ आला. त्याने वर पाहिले. तेव्हा झाडावर चढून बसलेले अस्वलच नव्हे तर राजपुत्रही त्याच्या नजरेस पडला. तेव्हा सिंह अस्वलाला म्हणाला, "अस्वला, झाडाच्या फांदीवर झोपलेल्या त्या माणसाला तू खाली ढकलून दे. म्हणजे तो माझा भक्ष्य होईल आणि तुझाही जीव वाचेल." असे सिंहाचे शब्द ऐकून अस्वल

रागाने म्हणाले, "दुष्टा, त्या माणसाला मी मित्र मानले आहे. माझ्या प्राणावर बेतले तरी मी मित्राचा विश्वासघात करणार नाही." तेव्हा सिंह मुकाट्याने बसला. पण तो तेथून निघून मात्र गेला नाही.

काही वेळाने हिरण्यगुप्ताला जाग आली. तेव्हा अस्वल झोपी गेले. ते पाहून सिंह हिरण्यगुप्ताला म्हणाला, 'अरे माणसा, त्या अस्वलाला खाली ढकलून दे. म्हणजे मी त्याला घेऊन येथून निघून जाईन.' ते ऐकून भ्यालेला हिरण्यगुप्त सिंहाला खूष करण्याकरिता फांदीवर झोपलेल्या अस्वलाला खाली ढकलणार तोच अस्वल एकाएकी जागे झाले. त्याने हिरण्यगुप्ताचे कपट ओळखले. त्याची कृतघ्नता पाहून ते खूप संतापले. "तू मित्रद्रोह केलास म्हणून तुला वेड लागेल. आणि हा प्रसंग तुला पुन्हा कोणी कथन करीतोपर्यंत तू वेडाच राहशील." असा त्याने हिरण्यगुप्ताला शाप दिला.

त्याप्रमाणे सकाळी वेडा झालेला हिरण्यगुप्त घरी परत आला. तेव्हा त्याची तशी अवस्था पाहून योगानंद राजाला फार दुःख झाले. तो पश्चात्तापयुक्त स्वरात म्हणाला, "यावेळी वररुचि जर माझ्याजवळ असता तर त्याने माझ्या मुलाचे वेड तत्काळ नाहीसे केले असते!" असे राजाचे शब्द ऐकून शकटालाला वाटले की, वररुचीला एकांतवासातून प्रकट होण्यास ही एक सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. अशा विचाराने त्याने प्रथम अभय मागून नंतर वररुची जिवंत आहे, असे राजाला सांगितले. तेव्हा आनंदित झालेल्या राजाने वररुचीला मोठ्या सन्मानाने आपल्यापुढे आणण्याची शकटालाला आज्ञा केली.

राजाज्ञेप्रमाणे शकटालाने थोड्याच वेळात वररुचीला राजाकडे नेले. तेव्हा राजाने त्याला हिरण्यगुप्ताच्या वेडाचे वृत्त सांगितले आणि अकस्मात तो वेडा कसा झाला असे त्याला विचारले. तेव्हा सरस्वतीच्या कृपाप्रसादाने वररुचीला त्याचे कारण कळले. तो म्हणाला, "राजन् हिरण्यगुप्ताने मित्रद्रोहाचे पाप केले त्यामुळे त्याला वेड लागण्याचा शाप मिळाला." असे सांगून वररुचीने अरण्यात घडलेला प्रसंग राजाला कथन केला, तो ऐकताच तेथे असलेला

हिरण्यगुप्त शापमुक्त होऊन त्याचे वेड नाहीसे झाले. या घटनेने आश्चर्यचकित झालेल्या राजाने वररुचीला विचारले, 'तुला हे कसे समजले ?' तेव्हा वररुची म्हणाला, 'राजन् बुद्धिमान माणसे फक्त लक्षणे, तर्क आणि कल्पना यांच्या साहाय्याने किती तरी गोष्टी जाणण्यास समर्थ असतात. त्यांच्याच बळावर मी महाराणीच्या हनुवटीवरील तीळ जाणला. त्याप्रमाणे अरण्यातला प्रसंगही मला कळला.'' असे वररुचीचे शब्द ऐकून राजाला आपल्या कृतघ्न वर्तनाची लाज वाटली. आणि त्याला फार पश्चात्ताप झाला. पुढे राजाने वररुचीचा मोठ्या थाटामाटाने सत्कार करण्याचे योजिले, पण तो सत्कार स्वीकारण्याची वररुचीला इच्छाच उरली नव्हती. मी निष्कलंक आहे, हे राजाला समजले; हेच माझे फार मोठे समाधान आहे. असे समजून त्याने सर्वांचा निरोप घेतला आणि तो पाटलीपुत्र नगराकडे निघाला.

बऱ्याच कालावधीनंतर आता आपण आपल्या पत्नीला व मातेला भेटणार म्हणून आनंदित झालेल्या वररुचीने सत्वर प्रवास करून आपले नगर गाठले. आपल्यापुढे दुःखाचे ताट वाढून ठेवले आहे, याची त्याला कल्पना नव्हती. तो घरापाशी गेला. तेव्हा ते बंद असल्याचे त्याला दिसले. ते पाहून आश्चर्याबरोबर अशुभाची शंकाही त्याच्या मनात डोकावली. जवळपास राहणाऱ्या लोकांजवळ त्याने घर का बंद आहे याची चौकशी केली. पण त्याच्या दर्शनाने जो तो गोंधळून जाई. आणि खाली मान घालून निमूट बसे. आणि हळूच आपले डोळे पुसून टाकी. तेव्हा वररुची आपला सासरा उपवर्ष याच्या घरी गेला. तेव्हा तो भ्रमिष्ट असल्यासारखा वररुचीला दिसला. वररुचीला पाहून उपवर्षही मोठा अस्वस्थ झाला. वररुचीने उपकोशेबद्दल त्याला विचारले, तेव्हा तो म्हणाला, ''राजाने तुम्हाला ठार मारले, हे वृत्त ऐकून उपकोशेने आपले शरीर अग्नीला समर्पण केले. आणि अत्यंत शोकमग्न झालेल्या तुमच्या मातेने प्राणत्याग केला.'' असे आपल्या सासऱ्याचे वज्राघातासारखे शब्द कानी पडताच दारुण दुःखाने वररुचीला मूर्छा आली. उपवर्षाने त्याला लवकरच सावध केले. त्याचवेळी वररुचीचे गुरु वर्षाचार्य तेथे आले. त्यांनी त्याला बोध करून त्याचे सांत्वन केले. अखेर वररुची संसाराविषयी विरक्त झाला. आणि

तपश्चर्या करण्याकरिता तपोवनात निघून गेला.

पुढे काही दिवसानी अयोध्येहून एक ब्राह्मण त्या तपोवनात आला. वररुचीने त्याला योगानंदाबद्दलचे वृत्त विचारले. तेव्हा तो मोठ्या दुःखाने म्हणाला, "वररुची, तू अयोध्या नगरीचा त्याग करून निघून गेलास आणि शकटालला राजाचा सूड घेण्याची संधी मिळाली. राजाला कसे मारावे या संबंधीचा विचार त्याच्या मनात होताच. एके दिवशी चाणक्य नावाचा एक ब्राह्मण रस्त्याने जात असता तेथील दर्भ टोचून त्याच्या पायास जखम झाली. तेव्हा मोठ्या रागाने मुळासकट दर्भ उपटून काढण्यासाठी तो जमीन खणू लागला. हे वृत्त शकटालला कळताच राजाचा नाश करण्यास या ब्राह्मणाचा उपयोग करून घ्यावा असे त्याने ठरविले.

शकटालने चाणक्याला राजाच्या घरी श्राद्धानिमित्त आमंत्रित केले. त्याप्रमाणे चाणक्य आला आणि तेथे असलेल्या ब्राह्मणांच्या अग्रस्थानी जाऊन बसला. पण ते स्थान आपणास मिळावे अशी विनंती सुबंधु नावाच्या एका ब्राह्मणाने केली. तेव्हा सुबंधुच अग्रस्थानी बसण्यास योग्य आहे, असे शकटालने राजास सांगितले. तेव्हा राजाने चाणक्याला त्या स्थानावरून उठविले. त्यामुळे तो भयंकर संतापला, आणि सर्वांदेखत त्याने आपल्या शेंडीची गाठ सोडून प्रतिज्ञा केली. 'सात दिवसांच्या आंत मी नंद राजाचा नाश करीन. नंतर माझा क्रोध शांत झाल्यावर मग मी माझ्या शेंडीला गाठ मारीन !' हा ब्राह्मण काहीतरी बडबडत आहे, म्हणून राजाने त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले.

पण सूडाने भारलेल्या शकटालने चाणक्याला गुप्तपणे आपल्या घरी ठेवून घेतले. तेथे चाणक्याने सहा दिवस अहोरात्र राजाच्या नाशार्थ मंत्रतंत्र साधना केली. त्यामुळे राजाला सपाटून ज्वर आला व तो सातव्या दिवशी त्या तापामुळे मृत्यू पावला. पुढे शकटालने हिरण्यगुप्त राजपुत्रलाही मारून टाकले. आणि चंद्रगुप्त नावाच्या दुसऱ्या नंदपुत्रास गादीवर बसविले. चंद्रगुप्ताचे महामंत्रीपद त्याने चाणक्याला दिले. आणि अखेर संसारातून निवृत्त होऊन तो तपश्चर्या करण्याकरिता तपोवनाकडे निघून गेला."

अशी त्या ब्राह्मणाने सांगितलेली योगानंदाच्या दुर्दैवाची दुःखद कथा ऐकून वररुचीला फार दुःख झाले. तो सर्व गोष्टीविषयी जास्तच उदासीन झाला. आपले खिन्न मन प्रसन्न व्हावे म्हणून तो विंध्यवासिनी देवीचे दर्शन घेण्यासाठी गेला. तेथे त्याला काणभूती नावाचे एक पिशाच्च दिसले. हा काणभूती मागील जन्मी एक यक्ष होता; पण कुबेराच्या शापामुळे तो पिशाच्च झाला होता. अशा त्या काणभूतीला पाहताच वररुचीला आपल्या मागील जन्माची आठवण झाली. तो दिव्य ज्ञानी झाला. आणि त्याने शंकराने पार्वतीला गुप्तपणे सांगितलेली विद्याधराची दिव्य कथा काणभूतीला ऐकविली. अखेर तो म्हणाला, "पार्वतीच्या शापामुळे माझा मित्र माल्यवान गुणाढ्य या नावाने जन्मला आहे. तो तुला भेटेल तेव्हा मी तुला ऐकविलेली दिव्य कथा तू त्याला सांग. म्हणजे तुम्ही दोघेही शापमुक्त व्हाल. आणि आपापल्या वसतीस्थानाकडे परत जाल." असे काणभूतीला सांगून वररुची मोक्षप्राप्ती करून घेण्यासाठी म्हणून अतिशय शांत अशा बद्रिकाश्रमास गेला. तिथे त्याने देवीची अनन्य भावे भक्ति केली. तेव्हा प्रसन्न झालेल्या देवीने देहमुक्त होण्यासाठी त्याला एक उपाय सांगितला. त्या उपायाने वररुचीने आपल्या देहास दग्ध केले. आणि अखेर त्याने दिव्य गती प्राप्त करून घेतली. तो पुन्हा पुष्पदंत नावाचा शिवगण झाला.

# दानशूर तारावलोक

खूप खूप वर्षापूर्वीची गोष्ट. प्रसिद्ध शिबि राजाच्या कुळात चंद्रावलोक नावाचा एक राजा होता. त्याच्या जवळ कुवलयापीड या नावाचा एक मोठा हत्ती होता. त्याच्या अतुल सामर्थ्याने चंद्रावलोक राजा पृथ्वीवरील इतर सर्व राजांना अजिंक्य होऊन राहिला होता. कोणीही राजा त्याचा युद्धात पराभव करू शकला नव्हता. अशा त्या चंद्रावलोक राजाला आपल्या चंद्रलेखा महाराणीच्या ठायी महाचक्रवर्ती लक्षणांनी युक्त असा एक मुलगा झाला. राजाने त्याचे नाव तारावलोक असे ठेवले.

तारावलोक दान, धर्म, विवेक इत्यादी सद्‌गुण अंगी बाणवीत दिवसेंदिवस लहानाचा मोठा होऊ लागला. त्याने नाना विद्या व कला यात प्रावीण्य मिळविले. तो देखणा व तेजस्वी असून त्याचे दर्शन आनंददायक होते. तो मातृपितृभक्त होता. आणि याचकांची इच्छापूर्ती करण्याचे महान औदार्य त्याच्या ठायी होते. अशा आपल्या गुणवंत पुत्राचा, राजाने मद्र देशाच्या माद्री नावाच्या राजकन्येशी विवाह केला आणि त्याला यौवराज्याभिषेक केला. नंतर वडिलांच्या आज्ञेने तारावलोकाने राज्यात सर्वत्र अन्नछत्रे उघडली. प्रजेचे क्षेमकुशल पाहण्यासाठी दररोज तो कुवलयापीड हत्तीवर स्वार होऊन सर्वत्र संचार करीत असे. याचक जे मागेल ते त्याला देण्याचे त्याचे व्रत होते. तशीच वेळ आली तर स्वतःच्या जीविताचे दान करण्याचीही त्याची तयारी होती. अशा उदार तारावलोकाच्या कीर्तीने दश दिशा व्यापून टाकल्या. पुढे त्याला दोन जुळे मुलगे झाले. त्याने त्यांची राम व लक्ष्मण अशी नावे ठेवली. ते दोघे आपल्या आईवडिलांना व आजा आजींना आनंद देतच लहानाचे मोठे होऊ लागले.

तारावलोकाला झालेली अशा अतुलनीय सौख्याची प्राप्ती त्याच्या शत्रू राजांना पाहवेना. त्याचा अजिंक्य कुवलयापीड हत्ती, त्याची जगभर पसरलेली

धवल कीर्ती व चंद्र सूर्यासारखे तेजस्वी असे त्याचे दोन मुलगे ही सर्व त्यांच्या याचक बनून तारावलोकाकडे जा आणि त्याच्यापाशी कुवलयापीड हत्तीचं दान मागा. आम्हाला तो गजराज मिळाला तर आम्ही त्या राजाचा युद्धात सहजच पराभव करू. तुम्ही सांगितल्याप्रमाणे त्याने जर तुम्हाला तो दिला नाही तर त्याच्या औदार्याची अप्रतिष्ठा होईल. या दोहोंपैकी कोणतीही गोष्ट घडली तरी आम्हाला सारखाच आनंदच होईल.''

अशा आपल्या राजाच्या आज्ञेप्रमाणे ते ब्राह्मण तारावलोकाकडे गेले आणि त्याला म्हणाले, ''युवराज, आपल्या दातृत्वाची कीर्ती दिगंत पसरली आहे म्हणून आम्ही आपल्या कुवलयापीड हत्तीचं दान मागण्यासाठी आपणाकडे आलो आहोत.'' असे त्या ब्राह्मणांचे शब्द ऐकून, अन्य कोणाच्या तरी सांगण्यावरून ते अशा प्रकारचे दान मागत आहेत हे तारावलोकाने जाणले. पण याचक जे मागेल ते देण्याचे आपले व्रत आहे. याचक विन्मुख होण्यात आपली अप्रतिष्ठा आहे असा विचार करून स्थिरचित्त तारावलोकाने तो महागज ब्राह्मणांना दान देऊन त्यांची इच्छा पूर्ण केली.

कुवलयापीडाला नगरातून घेऊन चाललेले ब्राह्मण नागरिकांच्या दृष्टीस पडले. तेव्हा त्यांना फार राग आला. ते तत्काळ चंद्रावलोक राजाकडे गेले आणि त्याला म्हणाले, ''महाराज, आपणा सर्वांचं सर्वस्व, आपल्या राज्याचं भूषण, आपल्या शत्रूचा कर्दनकाळ असा जो आपला प्रिय कुवलयापीड, धर्मनिष्ठ युवराजांनी ब्राह्मणास दान देऊन टाकला आहे. हे युवराजांचं वागणं एखाद्या सर्वसंगपरित्याग केलेल्या तपस्व्यासारखं आहे. तेव्हा महाराज, आपण युवराजांना तपश्चर्या करण्याकरिता वनात पाठवा किंवा दान देऊन टाकलेल्या कुवलयापीडाला परत आणण्याची व्यवस्था करा. नाहीतर आम्हाला राजेपद अन्य कुणाला देण्याचा विचार करावा लागेल !''

असे आपल्या प्रजेचे संतप्त बोलणे चंद्रावलोकाने जसेच्या तसे आपल्या प्रतिहारीकडून तारावलोकाला कळविले. ते ऐकून तारावलोक म्हणाला, ''याचकाला न देण्यासारखं असं काही आहे, असं मला वाटत नाही. त्यामुळे त्या हत्तीचंही मी ब्राह्मणांस दान दिलं. पण नागरिकांच्या तंत्रानं

चालणाऱ्या या राज्याचा तरी मला कुठं लोभ आहे ? जी दुसऱ्याच्या उपयोगी पडत नाही अशा अस्थिर लक्ष्मीचा तरी मला कुठं मोह आहे ? म्हणून असल्या लोकात राहण्यापेक्षा अरण्यात परोपकारार्थ आपलं सर्वस्व अर्पण करणाऱ्या वृक्षराजात निवास करणंच योग्य आहे. आता यापुढं अशा स्वार्थी लोकांत राहणे नको." असे म्हणून तारावलोकाने आपला विचार आपली भार्या माद्री हिला सांगितला. त्या पतिनिष्ठ साध्वीलाही तो पसंत पडला.

नंतर तारावलोकाने आपल्या जवळची सर्व संपत्ती दान देऊन टाकली. वल्कले धारण केली आणि मातापित्यांच्या चरणांना मनोमन वंदन करून तो आपली भार्या व पुत्र यांच्यासह नगरातून बाहेर पडला. तो व त्याची पत्नी ही दोघेही सर्वस्वाचा त्याग करून पायीच चालले होते. फक्त त्यांची दोन लहान मुले मात्र रथातून त्यांच्याबरोबर येत होती. असा तारावलोक, मार्गाने जात असताना काही ब्राह्मण त्याच्याकडे गेले. आणि दान म्हणून त्यांनी रथाचे घोडे त्याला मागितले. तेव्हा त्या दानवीराने मोठ्या आनंदाने रथाचे घोडे सोडून त्यांना देऊन टाकले. नंतर ज्यात आपली लहान गोजिरी मुले बसली आहेत तो रथ तारावलोक आपल्या पत्नीसह ओढीत वनाकडे जाऊ लागला.

काही वेळाने वनापाशी पाहोचल्यावर थकलेला तारावलोक एका झाडाखाली विसावा घेण्यासाठी बसला. तेवढ्यात एक ब्राह्मण तेथे आला व त्याला म्हणाला, 'महाराज, आपला तो रथ मिळावा अशी माझी इच्छा आहे. आपण तो मला दान द्यावा अशी माझी विनंती आहे.' असे त्या ब्राह्मणाचे शब्द ऐकून तारावलोकाने त्याला विचारले, 'त्या रथाला घोडे नाहीत. तू तो कसा घेऊन जाणार ?' 'मी स्वतः ओढत घेऊन जाईन' असे त्या ब्राह्मणाचे बोल ऐकून तारावलोक निःशंक मनाने म्हणाला, 'ठीक आहे. मी तो तुला अर्पण केला आहे. घेऊन जा.'

तो ब्राह्मण रथ घेऊन निघून गेल्यावर तारावलोक आपली भार्या व मुले, राम व लक्ष्मण यांच्यासह पायीच चालत एका तपोवनात गेला. तेथे एका डेरेदार झाडाखाली पर्णकुटी तयार करून तो राहिला. त्या रमणीय तपोवनामध्ये

आपल्या प्रेमळ कुटुंबाच्या सहवासात त्या निरिच्छ व स्थितप्रज्ञ राजाचे दिवस आनंदात जाऊ लागले.

एके दिवशी माद्री फळे व फुले आणण्याकरिता पर्णकुटीबाहेर गेली असताना एक वृद्ध ब्राह्मण तिथे आला. तारावलोकाला वंदन करून तो म्हणाला, 'राजन्, तुझं औदार्य अलौकिक आहे म्हणून मी तुझ्यापाशी आलो आहे. तुझ्याकडून तुझ्या दोन्ही पुत्रांचं दान मला मिळावं अशी माझी इच्छा आहे !' असे त्या ब्राह्मणाचे हृदयावर आघात करणारे शब्द ऐकताच तारावलोकाला तशी याचना करणाऱ्या ब्राह्मणाचा मुळीच राग आला नाही. उलट त्याला वाटले, 'पुत्रयोगाचं दुःख मला व माझ्या पत्नीला धैर्यानं सोसता येईल. पण इच्छाभंग होऊन हा वृद्ध ब्राह्मण परत जाणं मला सहन होणार नाही. दैव माझ्या धैर्याची परीक्षाच घेत आहे असं दिसतंय !'

असा विचार करून तारावलोकाने आपले दोन्ही प्रियपुत्र, राम व लक्ष्मण त्या वृद्ध ब्राह्मणाला अर्पण केले. मोठ्या आनंदाने तो ब्राह्मण त्यांना घेण्याकरिता त्यांच्याजवळ गेला. तेव्हा ते त्याच्याकडे जाईनात. मग त्या निष्ठुर ब्राह्मणाने त्यांचे हात बांधले. आणि आपल्या वडिलांकडे रडत बघणाऱ्या त्या रामलक्ष्मणांना बळेच तो ब्राह्मण घेऊन चालता झाला, परंतु हृदयाला पाझर फोडणारे ते दृश्य समक्ष बघत असताना सुद्धा तारावलोक दुःखी कष्टी किंवा संतप्त झाला नाही.

काही वेळाने फळे व पुष्पे घेऊन माद्री पर्णकुटीकडे परत आली. तेव्हा पर्णकुटीत आपला पती खाली मान घालून बसला आहे व रामलक्ष्मण तिथे नाहीत असे तिच्या दृष्टीस पडले. त्याबरोबर भयाकुल होऊन तिने तारावलोकाला विचारले, 'आर्यपुत्र, आपले लाडके राम, लक्ष्मण इथं दिसत नाहीत. कुठाहेत ते ?' तेव्हा राजा हलक्या आवाजात तिला म्हणाला, 'देवी, इथं एक गरीब वृद्ध ब्राह्मण आला होता. त्यानं माझ्यापाशी आपल्या प्रिय रामलक्ष्मणांची याचना केली. म्हणून मी ते त्याला देऊन टाकले !' असे आपल्या पतीचे शब्द ऐकून ती निर्मोही साध्वी शांतपणे म्हणाली, 'तसं असेल तर माझी

चिंता दूर झाली. आर्यपुत्र, आपण खरंच चांगली गोष्ट केलीत. दारी आलेल्या याचकाला निराश करून परत पाठविणं आपल्या ब्रीदाला शोभलं नसतं!'

तारावलोक व माद्री यांची अशी धीरोदा त्तता पाहून त्रिभुवन कंपित झाले. एवढेच नव्हे तर इंद्राचे आसन सुद्धा स्वस्थानाहून ढळले. तेव्हा असे का झाले ते इंद्र स्थिरचित्त होऊन पाहू लागला. त्याबरोबर तारावलोक व माद्री यांच्या अतुल दातृत्वाचा तो प्रभाव आहे हे त्याच्या ध्यानी आले. तेव्हा आपणही त्या दानी राजाची परीक्षा घ्यावी असा त्याने विचार केला. त्याप्रमाणे एका म्हाताऱ्या ब्राह्मणाचे रूप धारण करून इंद्र तारावलोकाच्या पर्णकुटीकडे गेला. आता तारावलोकाजवळ त्याच्या भार्येशिवाय अन्य काहीही उरले नव्हते. म्हणून ब्राह्मणवेषधारी इंद्राने त्याच्याजवळ त्याच्या भार्येचीच मागणी केली. तेव्हा निःशंक मनाने ती मान्य केल्याचे अर्ध्य तारावलोक ब्राह्मणाच्या हातावर सोडण्यास तयार झाला. पण ब्राह्मणाने त्याला विचारले, 'राजन्, अशा आज्ञाधारक व पतिव्रता भार्येला दान देऊन तू काय मिळविण्याची इच्छा धारण केली आहेस?' असे त्या ब्राह्मणाचे शब्द ऐकून तारावलोक त्याला म्हणाला, 'महाराज, मला मिळवायचं असं काहीही राहिलं नाही. आता माझी एवढीच इच्छा आहे की कोणा ब्राह्मणाला स्वप्राणाचेही दान देऊन टाकावं!' असे तारावलोकाचे बोल ऐकून अत्यंत संतुष्ट व आनंदित झालेल्या इंद्राने आपले सत्य स्वरूप प्रगट केले व तो म्हणाला, 'राजन्, धन्य आहेस तू! तुझी असामान्य धीरोदात्तता पाहून मी संतुष्ट झालो आहे. मी तुझ्या दातृत्वाची परीक्षा घेण्यासाठी ब्राह्मणाचा वेष धारण करून तुझ्या पत्नीचे दान मागितले. ते आता मला नको. तू लवकरच विद्याधरांचा चक्रवर्ती सम्राट होशील.'- एवढे बोलून इंद्र अदृश्य झाला.

तिकडे तो वृद्ध ब्राह्मण, तारावलोकाकडून दान म्हणून प्राप्त झालेल्या त्याच्या दोन पुत्रांना घेऊन ज्या नगराकडे निघाला होता त्या नगराची वाट चुकून दैवयोगाने चंद्रावलोक राजाच्या नगरास पोहोचला. नंतर राजमार्गावरून तो थेट बाजारात गेला. व तेथे तो तारावलोकांच्या पुत्रांना विकत घेण्यास कोणी

गिऱ्हाईक मिळते का ते पाहू लागला. पण नागरिकांनी त्या दोन लहान राजपुत्रांना ओळखले व त्यांनी ती वार्ता त्वरेने राजास कळविली. तेव्हा राजाने, त्या ब्राह्मणास राजपुत्रांसह घेऊन येण्यास आपल्या प्रतिहारीला आज्ञा केली.

थोड्याच वेळात प्रतिहारीने त्या ब्राह्मणास आणून राजासमोर उभे केले. त्याच्याबरोबर असलेल्या आपल्या गोजिऱ्या नातवांना पाहून राजाचे डोळे भरून आले. 'हे दोन मुलगे तुला कसे मिळाले ?' असे त्याने ब्राह्मणास विचारले. त्याबरोबर त्याने सत्य हकीकत राजाला सांगितली. ती ऐकून राजाचे हृदय सुखदुःखांच्या भावनांनी हेलावले. सत्त्वशील तारावलोकाच्या धीरोदात्ततेचा व निस्पृहतेचा त्याला साक्षात्कार झला. व स्वतःच्या राज्याबद्दलची निरिच्छता त्याच्या मनात झाली. त्याने त्या वृद्ध ब्राह्मणाला खूप द्रव्य दिले व त्याच्याकडून त्याने आपले दोन्ही नातू विकत घेतले. नंतर त्यांना बरोबर घेऊन चंद्रावलोक राजा आपल्या परिवारासह जिथे तारावलोक राहात होता त्या तपोवनाकडे निघाला.

काही दिवसांनी त्या तपोवनात प्रवेश केल्यावर जटा व वल्कले धारण केलेला आपला पुत्र तारावलोक राजाच्या दृष्टीस पडला. त्याचवेळी पर्णकुटीकडे येणाऱ्या आपल्या पित्याला तारावलोकाने पाहिले. त्या बरोबर धावत जाऊन त्याने आपल्या पित्याच्या चरणांना घट्ट मिठी मारली. तेवहा राजाने त्याला उठवून छातीशी धरले व आपल्या आसवांच्या धारांनी न्हाऊन टाकले. नंतर त्याने रामलक्ष्मणांना तारावलोकाच्या स्वाधीन केले व ते कसे प्राप्त झाले हे वृत्तही त्याला सांगितले.

कितीतरी दिवसांनी भेटलेले ते पितापुत्र आपापली हकीकत एकमेकास सांगू लागले, तेवढ्यात एकाएकी आकाशातून देवी लक्ष्मी चार दातांच्या हत्तीसह खाली उतरली. तिच्या मागून कित्येक विद्याधर राजेही खाली उतरले. लक्ष्मी देवी तारावलोकाला म्हणाली, 'वत्सा, तू आपल्या अलौकिक दानाच्या सामर्थ्यानं विद्याधरांच्या राज्याचं चक्रवर्तीपद प्राप्त करून घेतलं आहेस. यास्तव या दिव्य गजावर आरूढ होऊन तू विद्याधरांच्या लोकास



माझ्याबरोबर चल!' असे लक्ष्मीचे शब्द ऐकून तारावलोकाने आपल्या मात्यापित्यांच्या चरणावर मस्तक ठेवून त्यांचा निरोप घेतला. नंतर तारावलोक माद्री व रामलक्ष्मण यांच्यासह त्या दिव्य गजावर बसून विद्याधर राजांच्या जयजयकारात देवी लक्ष्मी बरोबर विद्याधरलोकास गेला.

तेथे, सर्व विद्या ज्याच्या आश्रयार्थ आल्या अशा त्या तारावलोकाने दीर्घकाळ विद्याधरांच्या साम्राज्यश्रीचा आस्वाद घेतला.

# देणाऱ्याला दैव देते

चित्रकूट नावाचे एक नगर होते. त्या नगराच्या राजाचे नाव होते ब्राह्मणवर. तो मोठा सदाचार संपन्न व धर्मशील होता. ब्राह्मणावर त्याची फार श्रद्धा होती. त्यामुळे त्यांच्या यज्ञयागादि धार्मिक कृत्यांना राजाकडून नेहमीच सर्वतोपरि साह्य होत असे.

अशा त्या राजाच्या सेनापतीचे नाव होते तत्त्वशील. तत्त्वशील मोठा शूर व शस्त्रास्त्र प्रवीण होता. त्याने अनेक लढायात आपल्या शौर्याने जय प्राप्ती करून घेतलेली होती. त्याने अनेक लढायात आपल्या शौर्याने जय प्राप्ती करून घेतलेली होती. तत्त्वशील जसा शूर तसा दानशूरही होता. राजा त्याला दरमहा वेतन म्हणून शंभर सुवर्णमुद्रा देत असे. पण त्यातून संसाराचा खर्च भागवून दानधर्म करण्यासाठी फारसे द्रव्य उरत नसे. तत्त्वशीलाला पुत्रसुख नव्हते. त्यामुळे कष्टी झालेल्या मनाला त्याने दानधर्माने प्राप्त होणाऱ्या सात्त्विक आनंदाचीच सोबत करून दिली होती.

त्याला वाटे, दैवानं मला पुत्रसुखापासून वंचित केलं. पण दानधर्म करण्याची बुद्धि दिली हे चांगलंच झालं. परंतु मनासारखा दानधर्म करण्यास माझ्याजवळ द्रव्य नाही. 'जीर्ण व शुष्क असे एखादे झाड किंवा एखादा पाषाण होणंही चांगलं. पण या संसारात दरिद्री व दानशील म्हणून जन्माला येणं चांगलं नाही.' असा नेहमीचाच विचार करणाऱ्या त्या सन्मार्गी तत्त्वशीलावर एके दिवशी सुदैवानं कृपा केली. त्या दिवशी तो नेहमीप्रमाणे सकाळी नगराजवळच्या उद्यानात फिरावयास गेला होता. तेव्हा तेथे असलेल्या अशोक वृक्षाजवळची थोडी जमीन एकाएकी खचून तिथे एक लहान खड्डा झाल्याचे दृश्य तत्त्वशीलाच्या नजरेस पडले. तेथे अकस्मात काय झाले हे जाणून घेण्याच्या उत्सुकतेने तो त्या खड्ड्यापाशी गेला. तेव्हा सुमारे दोन तीन फूट खोल असलेल्या त्या खड्ड्याच्या तळाशी काहीतरी चमकत असल्याचे त्याला दिसले.

ते काय आहे हे बघावे म्हणून खाली बसून तो तळाची माती बाजूस सारू लागला. तेव्हा तिथे त्याला एक मध्यम आकाराची संदूक आढळली. ती वर काढून घेत असताना आकाराच्या मानाने ती बरीच जड आहे असे त्याला जाणवले. नंतर ती संदुक घेऊन तो घराकडे चालू लागला.

घरी जाताच तत्त्वशीलाने मोठ्या उत्सुकतेने ती संदुक उघडली आणि त्याचे डोळे अक्षरशः दिपून गेले. त्या संदुकीत सोन्याच्या लगडीबरोबर बरीच नाना प्रकारची तेजाळ रत्नेही होती. तो अमूल्यनिधी बघत असताना, तो दैवाचा कृपाप्रसादच आहे असे तत्त्वशीलास वाटले. आता त्याची द्रव्याची अडचण नाहीशी झाली. त्यामुळे तो मोठ्या सुखात राहू लागला. मनासारखे दान देऊ लागला. एवढेच नव्हे तर आपल्या नातलगांना, मित्रांना व नोकरांनाही लहान मोठ्या देणग्या देऊ लागला.

तेव्हा तत्त्वशीलाचा विनाकारण मत्सर करणारे जे लोक त्या नगरात होते त्यांना वाटले, 'तत्त्वशीलाला खचितच कुठेतरी गुप्तधन सापडले असावे म्हणूनच तो वाटेल तसे ते खर्च करीत आहे.' असे वाटून घेऊन ते लोक स्वस्थ बसले नाहीत तर त्यांनी ती वार्ता राजाच्या कानी घातली. तेव्हा राजाने तत्त्वशीलाला बोलावणे पाठविले. त्याप्रमाणे तो राजाची भेट घेण्यास राजसभेकडे निघाला. तो तिथे पोहोचताच त्याच्या आगमनाचे वृत्त सांगण्यास द्वारपाल राजाकडे गेला. तोपर्यंत तत्त्वशील राजसभेसमोरच्या अंगणाच्या एका कोपऱ्यात उभा राहिला. तेथे सहजच त्याने आपल्या हातातील काठी तीन चार वेळा जमिनीवर आपटली. त्या आघातानी जमीन खचून तेथे एक खळगा निर्माण झाल्याचे तत्त्वशीलाला दिसले. तेव्हा मोठ्या आश्चर्याने त्याने त्या खळग्यात डोकावून पाहिले. तो तिथे त्याला सुवर्णमुद्रांनी भरलेली एक तांब्याची घागर आढळली. या आकस्मिक घटनेने विस्मित झालेल्या तत्त्वशीलाने चटकन् तो खळगा त्यात माती टाकून बुजवून टाकला.

तेवढ्यात राजाज्ञा घेऊन आलेल्या द्वारपालाने त्याला राजसभेत नेले. राजासमोर जाताच तत्त्वशीलाने राजाला वंदन केले. तेव्हा राजा त्याला म्हणाला, "मित्रा, तुला गुप्तधन मिळालं आहे. तेव्हा ते तू आमच्याकडं आणून दे !" असे राजाचे शब्द ऐकून तत्त्वशील म्हणाला, 'महाराज, कोणतं गुप्तधन

मी आपणास देऊ? पूर्वी मिळालेलं की आज मिळालेलं?' 'आज मिळालेलं गुप्तधनच मला आणून दे!' अशी राजाने आज्ञा करताच तत्त्वशीलाने अंगणाच्या कोपऱ्यात सापडलेला निधी राजाला आणून दिला. तेव्हा संतुष्ट झालेला राजा त्याला म्हणाला, "मित्रा, पूर्वी मिळालेल्या संपत्तीचा तू तुझ्या इच्छेप्रमाणं विनियोग कर. ती संपत्ती तुझीच आहे!"

नंतर राजाज्ञा घेऊन भाग्यशाली तत्त्वशील आपल्या घरी गेला. आणि सदाचाराने दान व भोग यांच्याकरिता प्राप्त धनाचा विनियोग करू लागला.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
बा. क्र. २९८९ दिनांक ३१।३।८७
विषय बा. वा. क्र. ..........

# सोमप्रभा कुणाला द्यायची?

फार वर्षापूर्वी उज्जयिनी नगरात पुण्यसेन राजाच्या पदरी एक विद्वान आणि सदाचार संपन्न असा हरिस्वामी नावाचा एक द्विज होता. त्याच्या सद्गुणावर प्रसन्न झालेल्या राजाने त्याला आपला मुख्यमंत्री केले होते. हरिस्वामीला देवस्वामी नावाचा एक सद्गुणी मुलगा होता. त्याचप्रमाणे असामान्य अशी सोमप्रभा नावाची एक कन्याही होती. ती जेव्हा उपवर झाली तेव्हा ती आपले माता-पिता भाऊ यांना नम्रपणे म्हणाली, "आपण आता माझ्यासाठी अनुरूप अशा वराचे संशोधन करीत राहणार. तेव्हा त्यासंबंधी माझी एक कळकळीची विनंती आहे. तुम्ही माझ्यासाठी जो वर पसंत कराल तो शूर तरी असावा किंवा ज्ञानी तरी असावा किंवा विज्ञानी तरी असावा. अशा वराशिवाय दुसऱ्या कोणाच्याही हाती कृपा करून माझा हात देऊ नका!"

अशी आपल्या प्रिय कन्येची विनंती ऐकून तसा वर कसा प्राप्त होईल म्हणून हरिस्वामीला काळजी वाटू लागली. 'सोमप्रभेच्या इच्छेप्रमाणे तिला वरप्राप्ती करून देणे तिला सुखाचे होईल आणि तिच्या सुखात आपणही सुखी होऊ' अशा विचाराने हरिस्वामीने त्या दृष्टीने वरसंशोधनाच्या कार्यास सुरुवात केली. पण तेवढ्यात दक्षिणेकडील एक राजा आपल्या नगरावर स्वारी करण्यास येत आहे अशी वार्ता पुण्यसेन राजाच्या कानी पडली. पुण्यसेन राजाची त्या बरोबर लढाई करण्याची इच्छा नव्हती. तो राजा बलाढ्य असल्याने त्यांच्याशी तह करावा असे त्याचे मत होते. म्हणून पुण्यसेन राजाने त्या कामासाठी हरिस्वामीला दूत म्हणून त्या राजाकडे पाठविले.

बऱ्याच दिवसाच्या प्रवासानंतर हरिस्वामी त्या राजनगरीत पोचला. तिथे त्याने राजाची भेट घेऊन पुण्यसेन राजाचा निरोप व त्याची तह करण्याची इच्छाही त्याला सांगितली. त्याप्रमाणे उभयपक्षी योग्य असा संधी करण्याचे

कार्य झाल्यानंतर काही दिवस हरिस्वामी त्या नगरात राहिला. एके दिवशी सोमप्रभेच्या लावण्याची कीर्ती ज्याच्या कानी पडली आहे, असा एक देखणा तरुण हरिस्वामीकडे आला आणि त्याने हरिस्वामीजवळ सोमप्रभेला मागणी घातली. तेव्हा हरिस्वामी त्याला म्हणाला, "तू सोमप्रभेला मागणी घातलीस याबद्दल मला काही पण म्हणायचे नाही. आपला भावी पती कसा असावा यासंबंधीची तिची इच्छा तुला माहीत आहे काय ? तिला ज्ञानी किंवा विज्ञानी किंवा शूर असा पती हवा आहे. यापैकी तुझ्याजवळ कोणता गुण आहे ?"

असे हरिस्वामीचे शब्द ऐकून तो देखणा तरुण म्हणाला, 'महाशय, मी विज्ञानी आहे. नाना प्रकारच्या कलांचे कौशल्य मी जाणतो. एवढंच नव्हे तर त्यात मी पारंगतही आहे.' "अस्सं!" हरिस्वामी आश्चर्याने उद्गारला, "मग तू आपल्या विज्ञानाची पारंगतता प्रथम मला दाखव म्हणजे माझी खात्री होईल." मग "ठीक आहे," असे आनंदाने म्हणून त्या देखण्या तरुणाने आपल्या कलाकौशल्याच्या सामर्थ्याने आकाशातून भ्रमण करता येणारा असा एक सुंदर रथ अल्पावधीचत तयार केला. नंतर त्याने हरिस्वामीला त्या रथात बसण्याची विनंती केली. त्याप्रमाणे हरिस्वामी रथात बसताच त्याने तो रथ आकाशात नेला. नंतर तो खूप उंच नेऊन त्या तरुणाने हरिस्वामीला रथाचे भ्रमण चालू असतानाच तिथे असलेले स्वर्गादि लोक दाखविले. बराच वेळ आकाशात भ्रमण करून त्या तरुणाने अखेर तो रथ भूमीवर उतरविला आणि हरिस्वामीला सुखरूपपणे त्याच्या निवासस्थानी पोचविले. अशा रीतीने हरिस्वामीने त्या तरुणाच्या विज्ञानाची परीक्षा घेतली. त्या तरुणाच्या विज्ञानविद्येचे असामान्य सामर्थ्य पाहून हरिस्वामी खूष झाला आणि त्याने त्याला सोमप्रभेशी त्याचा विवाह करून देण्याचे मान्य केले. एवढेच नव्हे तर त्या दिवसापासून सातव्या दिवशी त्याने त्यांच्या विवाहाचा मुहूर्तही निश्चित करून टाकला.

त्याच सुमारास आणखी एक देखणा तरुण हरिस्वामीच्या घरी गेला. त्यानेही सोमप्रभेच्या सौंदर्याची ख्याती ऐकली होती. तेव्हा तिच्याशी आपला विवाह व्हावा अशा इच्छेने त्याने देवस्वामीची भेट घेतली. आणि आपली इच्छा त्याला सांगितली. तेव्हा देवस्वामी म्हणाला, 'माझी बहीण सोमप्रभा ज्ञानी किंवा

विज्ञानी किंवा शूर याशिवाय दुसऱ्या कुणालाही वरण्याची मुळीच इच्छा करीत नाही. यापैकी तुम्ही कोण आहात ?' तेव्हा तो तरुण म्हणाला, "मी शूर आहे. माझ्या शौर्यासंबंधीच्या काही गोष्टी तुमच्या कानावर आल्या असतीलच. शौर्याबरोबर मी नाना प्रकारची शस्त्रास्त्रे हाताळण्यामध्येही कुशल आहे. तुम्हाला माझी परीक्षा पाहायची असेल तर पहा." त्याप्रमाणे देवस्वामीने त्याची परीक्षा घेतली आणि त्याच्या शौर्यावर व शस्त्रास्त्र कौशल्यावर तो प्रसन्न झाला आणि सोमप्रभेचा विवाह त्याच्याशी करण्याचे त्याने मानय केले.

विवाहमुहूर्ताबद्दल देवस्वामीने ज्योतिषाचा सल्ला घेतला. त्याने दिलेल्या सल्ल्यावरून सातव्या दिवशीच त्याने लग्नकार्य निश्चित केले आणि त्याप्रमाणे त्या देखण्या तरुणास सांगूनही टाकले. देवस्वामीने सोमप्रभेच्या विवाहाबद्दल निश्चित केलेले वृत्त त्याच्या आईला कळले नव्हते. कारण त्यावेळी ती घरात नव्हती. नगरात असलेल्या आपल्या एका नातलगास भेटण्यास ती गेली होती. ती तिथे असताना सोमप्रभेच्या सौंदर्याबद्दल ऐकून असलेल्या एका विवाहेच्छू देखण्या तरुणाने तिची भेट घेतली आणि सोमप्रभेचे लग्न आपल्याशी व्हावे अशी विनंती त्याने तिला केली. ती ऐकून हरिस्वामीची भार्या त्याला म्हणाली, "लग्नाच्या बाबतीत माझ्या मुलीचा एक पण आहे. तिला ज्ञानी, विज्ञानी किंवा शूर असाच पती पाहिजे. तेव्हा त्यापैकी तुम्ही कुणी असाल तर तसं सांगा."

असे तिचे शब्द ऐकून तो तरुण म्हणाला, "बाई, मी ज्ञानी आहे. तुम्हाला मला जर काही विचारायचे असेल ते विचारा आणि माझ्या ज्ञानाची परीक्षा घ्या. म्हणजे खरे काय ते तुम्हाला कळेल." तेव्हा हरिस्वामीच्या भार्येने त्या तरुणाला इकडच्या तिकडच्या, मागच्या पुढच्या अशा पुष्कळ नाना प्रकारच्या गोष्टी विचारल्या. त्या त्याने बरोबर सांगितल्या. तेव्हा तो खरोखरच चांगला ज्ञानी आहे अशी तिची खात्री झाली आणि तिनेही, त्याने आपल्या कन्येला घातलेली मागणी मान्य केली. योगायोग असा की तिने त्यांच्या विवाहाचा मुहूर्त सातव्या दिवशीच निश्चित केला.

काही दिवसांनी हरिस्वामी उज्जयिनीस परत आला तेव्हा त्याच्या भार्येने, सोमप्रभेसाठी मी एक ज्ञानी वर निश्चित केला आहे, आणि त्यांच्या

विवाहाचा मुहूर्त सातव्या दिवशी निश्चित केला आहे. असे त्याला मोठ्या आनंदाने सांगितले. त्याचवेळी त्याचा मुलगा देवस्वामी आपल्या पित्याला म्हणाला, "बाबा, ताईसाठी मी एक शूर तरुण पसंत केला आहे. आणि विवाहासाठी 'तू सातव्या दिवशी ये' असे मी त्याला निश्चितपणे सांगितले आहे."

असे भार्या आणि पुत्र यांचे शब्द ऐकून आश्चर्याने गोंधळलेला हरिस्वामी त्यांना म्हणाला, "मी घरात आल्याबरोबर तुम्ही ही आनंदाची वार्ता मला सांगितली पण मला जे तुम्हांला सांगायचं आहे ते सांगायला मला अवसरच मिळाला नाही. सोमप्रभेसाठी मी देखील कलाकौशल्यात पारंगत अशा एका वराला पसंत करून 'तू विवाहाच्या तयारीने सातव्या दिवशी ये' असे त्याला निश्चयपूर्वक सांगितले आहे. आता झाले काय, आपणापैकी प्रत्येकाने एकमेकांस न कळवताच सोमप्रभेसाठी तिच्या इच्छेप्रमाणे योग्य वराची निवड केली. एवढेच नव्हे तर त्या नियोजित वरांना सातव्या दिवशीच लग्नाप्रीत्यर्थ येण्याचे निमंत्रण दिले. तेव्हा आता आपण काय करायचं ? खरंच आता मोठी चमत्कारिक परिस्थिती निर्माणं झाली आहे !"

या चमत्कारिक परिस्थितीतून सन्माननीय असा मार्ग कसा काढायचा या संबंधी खूप विचार करून सुद्धा हरिस्वामी, त्याची भार्या आणि त्याचा पुत्र देवस्वामी यांना कळेनासे झाले. त्यांची मती कुंठित होऊन ते फार चिंताक्रांत झाले. दिवसामागून दिवस जात सहा दिवस उलटून गेले आणि सातव्या दिवशी सकाळी सोमप्रभेच्या विवाहासाठी निमंत्रित केलेल्या तीन नियोजित वरांचे हरिस्वामीच्या घरी आगमन झाले. त्यापैकी एक ज्ञानी होता, दुसरा विज्ञानी तर तिसरा शूर होता.

त्याचवेळी एक मोठा चमत्कार घडून आला. जिच्या विवाहासाठी ते तीन तरुण आले होते ती सोमप्रभा एकाएकी नाहीशी झाली होती. त्यामुळे घरात मोठा गोंधळ उडाला. तिच्या शोधार्थ सर्वांनी धावपळ केली. घरात व नगराबाहेर तिचा शोध घेतला गेला पण ती कुठे, कशी आणि केव्हा गेली हे कोणालाही समजेना. खूप प्रयत्न करूनही तिचा शोध लागला नाही तो नाहीच. बिचारा हरिस्वामी, अतिशय कष्टी झाला. तेवढ्यात या नियोजित तीन

वरांपैकी एक ज्ञानी आहे ही गोष्ट त्याच्या लक्षात आली. तेव्हा तो त्याला म्हणाला, "हे ज्ञानवंता, एकाएकी नाहीशी झालेली माझी लाडकी कन्या सोमप्रभा कुठे गेली ? आणि सध्या ती कोठे आहे ते कृपा करून मला सांग !"

अशी हरिस्वामीची कळकळीची विनंती ऐकून तो ज्ञानी तरुण म्हणाला "महाशय, खरे वृत्त सांगितले तर भीतीने तुम्ही घाबरून जाल. धूमशिख नावाच्या एका राक्षसाने तुमच्या कन्येला अदृश्य रूपाने तुमच्या घरी येऊन उचलून नेले आहे. सध्या ती विंध्यारण्यातील त्या राक्षसाच्या रहाण्याच्या ठिकाणी सुखरूप आहे." असे त्या ज्ञानी पुरुषाचे शब्द ऐकताच हरिस्वामी अत्यंत भयग्रस्त होऊन दुःखाने म्हणाला, "अरेरे, माझा सर्वस्वी नाश झाला. आता आमची लाडकी सोमप्रभा आम्हाला परत कशी प्राप्त होणार ? आणि तिचे लग्न तरी कसे साजरे होणार ?" असे म्हणून बिचारा हरिस्वामी दुःखावेगाने शोक करू लागला.

तेव्हा तिथे असलेला सोमप्रभेचा नियोजित विज्ञानी वर हरिस्वामीला म्हणाला, "महाशय, घाबरू नका. धीर सोडून असे हतबल होऊ नका. सोमप्रभेला एका राक्षसाने विंध्यारण्यातील आपल्या निवास्थानाकडे नेले आहे असे आताच या ज्ञानी तरुणाने सांगितलेच आहे. तेथे अल्पावधीतच मी आपणा सर्वांना सत्वर घेऊन जातो." असे म्हणून त्याने थोड्याच वेळात आकाशात संचार करण्यास योग्य असा एक रथ आपल्या कलाकौशल्याच्या सामर्थ्याने तयार केला. नंतर त्याने हरिस्वामी, ज्ञानी व शूर यांना त्या रथात बसवले. आपण स्वतःही त्यात बसला. नंतर त्याने तो रथ काही क्षणातच विंध्यारण्यात नेला.

तो मायेने निर्माण केलेला रथ धूमशिख राक्षसाच्या रहाण्याच्या ठिकाणाकडे जाऊ लागताच त्याचा आवाज ऐकून तो अतिशय संतापला आणि आपल्या निवासस्थानातून सत्वर बाहेर आला. तेव्हा रथातून बाहेर पडत असलेली तीन माणसे त्याच्या दृष्टीस पडली. आपल्या प्रदेशात आलेल्या त्या आगंतुक माणसांचा नाश करावा म्हणून क्रुद्ध झालेल्या त्या राक्षसाने एक मोठी गर्जना ठोकली आणि तो पुढे धावला. तेव्हा अत्यंत भयभीत झालेल्या



हरिस्वामीने आपल्या बरोबर आलेल्या सशस्त्र शूर तरुणास राक्षसाबरोबर झुंजण्याची विनंती केली. तेव्हा तो त्या राक्षसाच्या अंगावर धावून गेला. त्या दोघांचे फार भयंकर युद्ध झाले. दोघांनीही नानाविध शस्त्रास्त्रांचा एकमेकावर उपयोग केला. अखेर अल्पावधीतच त्या शूरवीराने आपल्या धनुष्यातून सोडलेल्या अर्धचंद्र बाणाने त्या मत्त व गर्विष्ठ राक्षसाचे शिर आकाशात उडविले.

अशा प्रकारे त्या राक्षसाचा नाश केल्यानंतर हरिस्वामी त्या तरुणासह त्या राक्षसाच्या निवासस्थानी गेला आणि तिथे असलेल्या सोमप्रभेची त्याने सुटका केली. नंतर सर्वजण रथात बसले आणि सुखरूपपणे घरी परत आले. अजूनही विवाहाचा मुहूर्त टळला नव्हता. तेव्हा सोमप्रभेशी विवाह कोणी करायचा याबद्दल ज्ञानी, विज्ञानी व शूर यांच्यात मोठे भांडण सुरू झाले. ज्ञानी म्हणाला, 'सोमप्रभेशी विवाह करण्यास मीच योग्य आहे. कारण तिचा ठावठिकाणा मी तुम्हाला सांगितला नसता तर ती तुमच्या हाती लागलीच नसती.'' असे त्याचे बोलणे ऐकून विज्ञानी ठामपणे म्हणाला, 'मी माझ्या

कलाकौशल्याच्या सामर्थ्यानं मायेचा रथ निर्माण केला म्हणूनच आपण काही क्षणातच राक्षसाच्या निवासस्थानी जाऊन सोमप्रभेची सुटका करू शकलो. एवढंच नव्हे तर त्या रथामुळेच लग्नाचा मुहूर्त साधण्याचं कार्यही मी केलं आहे म्हणून सोमप्रभेचं लग्न माझ्याशीच झालं पाहिजे !' असे त्याचे बोलणे संपल्यावर शूर म्हणाला, 'तुम्ही जरी एवढ्या गोष्टी केल्या असल्या तरी त्या राक्षसाला मारून मी जर सोमप्रभेला मुक्त केलं नसतं तर सांगा, तुमचं ज्ञान व विज्ञान निरर्थकच झालं नसतं काय ? म्हणून सोमप्रभेचं पाणिग्रहण करण्यास मीच योग्य आहे.'

असे सोमप्रभेच्या नियोजित तिघा वरांचे भांडण ऐकत, काहीच न सुचेनासे होऊन एवढा वेळ गप्प बसलेला हरिस्वामी आता त्यांना म्हणाला, 'आमचे पुण्यसेन महाराज फार न्यायी आहेत. तेव्हा आपण सर्वजण आताच त्यांच्याकडं जाऊ आणि ते काय निर्णय देतील त्याप्रमाणं करू.' असे म्हणून ज्ञानी, विज्ञानी व शूर यांना बरोबर घेऊन हरिस्वामी राजाकडे गेला. राजाची भेट घेऊन त्याने हकीकत राजाला सांगितली आणि अखेर तो म्हणाला, 'महाराज, आपल्या निर्णयाप्रमाणं जो वर सोमप्रभेसाठी निश्चित होईल त्याच्याशी मी तिचा विवाह साजरा करतो. अजून लग्नाचा मुहूर्त टळलेला नाही.'

तेव्हा राजा म्हणाला, 'ज्यानं आपले पंचप्राण तळहातावर घेऊन मोठ्या शौर्यबलाने त्या दुष्ट राक्षसाचा निःपात करून सोमप्रभेची मुक्तता केली त्या शूरालाच ती देणं योग्य आहे. विधात्यानं ज्ञानी व विज्ञानी यांना शूराच्याच अंकित केलं आहे !'

असा राजाचा न्याय सर्वांनी शिरसावंद्य मानला. त्याप्रमाणे ठरलेल्या मुहूर्तावर हरिस्वामीने सोमप्रभा आणि शूर तरुण राजा यांचा विवाह मोठ्या थाटाने साजरा केला.

# समुद्र शरण आला

कोण्या एका समुद्राच्या किनाऱ्यावर एक टिट्टिभ पक्ष्याचे जोडपे राहात होते. टिट्टिभीच्या प्रसूतीची जेव्हा वेळ आली ती टिट्टिभाला म्हणाली, "आता आपण दुसरीकडे कुठेतरी जाऊन राहू. इथे राहणे नको. कारण इथेच मी जर प्रसूत झाले तर कदाचित हा समुद्र आपल्या लाटांनी माझ्या बाळांचा नाश करील." असे टिट्टिभीचे शब्द ऐकून टिट्टिभ तिला म्हणाला, "समुद्र माझ्याशी तसा वागणार नाही. मला विरोध करणं त्याला शक्य नाही." "तुम्ही असं कसं म्हणता ?" टिट्टिभी म्हणाली, "समुद्र केवढा मोठा ! त्या मानाने आपण किती क्षुद्र. तेव्हा तुम्ही त्याच्याशी आपली बरोबरी कशी करता ? कुणीही एखाद्याने जर हितकारक सल्ला दिला तर त्याप्रमाणे वागावं. नाहीतर विनाशाला आमंत्रण दिल्यासारखे होईल. ते कसे यासंबंधी मी एक कथा सांगते. ऐका."

कोण्या एका सरोवरात एक कासव राहात होते. त्याचे नांव होते कम्बुग्रीव. विकट व संकट या नावाचे दोन हंस त्या कासवाचे दोस्त होते. एकदा कडक उन्हाळ्यामुळे त्या सरोवरातले पाणी झरझर आटू लागले. तेव्हा कम्बुग्रीवाला वाटले, 'लवकरच आटून जाणाऱ्या या सरोवरात राहण्यात आता काही अर्थ नाही. दुसऱ्या एखाद्या स्वच्छ पाण्याच्या सरोवरात राहण्यास जाणे हे चांगले.' अशी आपली इच्छा त्याने आपल्या दोन मित्रांना सांगितली. आणि ते म्हणाले, "तुम्ही ज्या सरोवराकडे निघाला आहात तिथे मलाही तुमच्या बरोबर घेऊन चला."

असे कम्बुग्रीवाचे शब्द ऐकून ते हंसमित्र त्याला म्हणाले, 'मित्रा, आम्ही ज्या सरोवराकडे निघालो आहोत ते या ठिकाणाहून फार लांब आहे. तेव्हा तुझी जर आमच्याबरोबर येण्याची इच्छाच असेल तर आम्ही सांगितल्याप्रमाणे तुला वागावे लागेल. आम्ही दोन्हीकडून आमच्या चोचीत

कलाकौशल्याच्या सामर्थ्यानं मायेचा रथ निर्माण केला म्हणूनच आपण काही क्षणातच राक्षसाच्या निवासस्थानी जाऊन सोमप्रभेची सुटका करू शकलो. एवढंच नव्हे तर त्या रथामुळेच लग्नाचा मुहूर्त साधण्याचं कार्यही मी केलं आहे म्हणून सोमप्रभेचं लग्न माझ्याशीच झालं पाहिजे !' असे त्याचे बोलणे संपल्यावर शूर म्हणाला, 'तुम्ही जरी एवढ्या गोष्टी केल्या असल्या तरी त्या राक्षसाला मारून मी जर सोमप्रभेला मुक्त केलं नसतं तर सांगा, तुमचं ज्ञान व विज्ञान निरर्थकच झालं नसतं काय ? म्हणून सोमप्रभेचं पाणिग्रहण करण्यास मीच योग्य आहे.'

असे सोमप्रभेच्या नियोजित तिघा वरांचे भांडण ऐकत, काहीच न सुचेनासे होऊन एवढा वेळ गप्प बसलेला हरिस्वामी आता त्यांना म्हणाला, 'आमचे पुण्यसेन महाराज फार न्यायी आहेत. तेव्हा आपण सर्वजण आताच त्यांच्याकडं जाऊ आणि ते काय निर्णय देतील त्याप्रमाणं करू.' असे म्हणून ज्ञानी, विज्ञानी व शूर यांना बरोबर घेऊन हरिस्वामी राजाकडे गेला. राजाची भेट घेऊन त्याने हकीकत राजाला सांगितली आणि अखेर तो म्हणाला, 'महाराज, आपल्या निर्णयाप्रमाणं जो वर सोमप्रभेसाठी निश्चित होईल त्याच्याशी मी तिचा विवाह साजरा करतो. अजून लग्नाचा मुहूर्त टळलेला नाही.'

तेव्हा राजा म्हणाला, 'ज्यानं आपले पंचप्राण तळहातावर घेऊन मोठ्या शौर्यबलाने त्या दुष्ट राक्षसाचा निःपात करून सोमप्रभेची मुक्तता केली त्या शूरालाच ती देणं योग्य आहे. विधात्यानं ज्ञानी व विज्ञानी यांना शूराच्याच अंकित केलं आहे !'

असा राजाचा न्याय सर्वांनी शिरसावंद्य मानला. त्याप्रमाणे ठरलेल्या मुहूर्तावर हरिस्वामीने सोमप्रभा आणि शूर तरुण राजा यांचा विवाह मोठ्या थाटाने साजरा केला.

पकडलेल्या एका छोट्या काठीचा मध्यभाग तू आपल्या तोंडात गच्च धर. मग तू आमच्या बरोबर आकाशमार्गाने तिथे चल. एक गोष्ट मात्र चांगली लक्षात ठेव की काहीही झालं तरी तू आपल्या तोंडातून एक शब्दही बाहेर काढू नकोस. अगदी मुक्याप्रमाणे स्वस्थ रहा. नाही तर तुझ्या तोंडातील काठी सुटेल. आणि तू खाली पडून मरशील.' तेव्हा "ठीक आहे. तुम्ही सांगितल्याप्रमाणे मी वागेन. काहीही झाले तरी मी आपल्या तोंडवाटे एकही शब्द बाहेर काढणार नाही."

असे आपल्या हंस मित्रांना आश्वासन देऊन कम्बुग्रीवाने एक छोटी काठी आपल्या तोंडात धरली. नंतर त्याच्या हंस मित्रानी त्या काठीची दोन्ही टोके दोन्ही बाजूनी आपल्या चोचीत घट्ट धरली. आणि ते कासवाला घेऊन आकाशातून भराऱ्या मारीत निघाले. थोड्या वेळाने ते एका नगरावरून भरारत जाऊ लागले. तेव्हा नगरातील लोकांची त्यांच्याकडे नजर गेली. आणि तेव्हा ते आश्चर्याने ओरडले, "अरे, पहा पहा. वर आकाशात पहा. काय गंमत दिसते ती ! दोन हंस एका कासवाला कसे मजेत घेऊन जात आहेत ते पहा !"

असा लोकांचा कोलाहल कासवाच्या कानी पडला. तेव्हा त्याने आपल्या हंस मित्रांना विचारले, "हा खालून कसला गोंधळ ऐकू येत आहे?" त्याच वेळी त्याच्या तोंडातील काठी निसटली. आणि गरीब बिचारे ते मूर्ख कासव, आकाशातून वेगाने खाली आले. आणि जोराने जमिनीवर पडून मरण पावले !"

अशी कथा सांगून टिट्टिभी अखेर म्हणाली, "त्या कासवाप्रमाणेच ज्याची बुद्धि भ्रष्ट होते त्याचा नाश होत असतो." तेव्हा टिट्टिभ तिला म्हणाला, "तू सांगतेस ते खरेच आहे. आता मीही तुला एक कथा सांगतो. ती तू ऐक!" असे म्हणून टिट्टिभ कथा सांगू लागला.

"कोण्या एका नदीच्या पात्रात असलेल्या मोठ्या डोहात तीन मासे रहात होते. ते तिघेही एकमेकास साह्य करीत, मित्रत्त्वाच्या भावनेने एकत्रच रहात होते. एके दिवशी नदीच्या काठाने जाणाऱ्या कोळ्यांची नजर त्या डोहाकडे गेली. तेव्हा ते उद्गारले, 'अरेच्चा, त्या डोहात बरेच मासे दिसतात की !' असे त्या कोळ्यांचे शब्द त्या तीन माशांच्या कानी पडले. तेव्हा त्यातील

बुद्धिमान असणारा मासा आपल्या मित्रांना म्हणाला, "आता ते कोळी लवकरच परत येतील, आणि जाळे लावून आपणास पकडतील. तेव्हा आपण लगेच येथून दुसरीकडे निघून जावे हे चांगले !" पण त्याच्याबरोबर येण्यास दोन मित्र तयार नसल्याने अखेर तो एकटाच नदीच्या प्रवाहात शिरून दुसरीकडे निघून गेला.

तो निघून गेल्याव दुसरा मासा म्हणाला, "आत्ताच येथून निघून जाणयाची घाई नको. जेव्हा ते कोळी जाळे घेऊन आपणास धरण्यास येतील, त्यावेळी मी आपला जीव वाचविण्याची काहीतरी युक्ती करीन. आताच त्या गोष्टीची काळजी करायला नको." असे म्हणून तो त्या डोहातच राहिला. तिसरा मांसा म्हणाला, "माझ्या दैवात जे काही असेल तसं घडेल. त्यासंबंधी चिंता करून उगीच कशाला त्रास करून घ्यायचा !" असे म्हणून तोही त्या डोहातच राहिला.

दुसऱ्या दिवशी कोळी तेथे आले. आणि त्यानी आपले जाळे टाकले. थोडा वेळ जाऊ दिल्यानंतर त्यानी ते पाण्यातून वर ओढून घेतले. तेव्हा त्यात दुसरा मासा सापडला होता. पण तो मोठा शहाणा व विचारी होता. त्याने मेल्याचे सोंग घेतले. आणि तो जाळ्यात स्तब्ध पडून राहिला. ते पाहून कोळ्यांना वाटले की हा मासा मेला आहे. तेव्हा त्याला पुन्हा आता मारण्यात काही अर्थ नाही. असे समजून त्यांनी त्याला त्या जाळ्यातून बाहेर काढून वाळूवर ठेवले न ठेवले तोच त्या माशाने टुणकन् नदीच्या प्रवाहात उडी घेतली. आणि तो त्वरेने दूर निघून गेला. दैवावर विश्वास ठेवून राहिलेला मासाही त्या जाळ्यात अडकलेला होता. पाण्यातून जाळे वर येताच तो त्या धडपडू लागला. तेव्हा कोळ्याने त्याला पकडून मारून टाकले !"

अशी कथा सांगून टिट्टिभ टिट्टिभीला म्हणाला, "तसाच प्रसंग आला तर मला काय करायचे ते मी करेन पण समुद्राची धास्ती बाळगून आपली राहण्याची जागा सोडून कुठेही दुसरीकडे जाणार नाही." असे सांगून टिट्टिभ, आपल्या भार्येसह तिथेच आपल्या वसतीस्थानात राहिला. टिट्टिभाचे गर्वाचे बोलणे समुद्राने ऐकले. असेच काही दिवस लोटल्यानंतर टिट्टिभी प्रसूत झाली. तेव्हा समुद्राने विचार केला, 'हा गर्वाने बोलणारा टिट्टिभ मला काय कार करणार आहे, ते तर बघू या.' अशा विचाराने समुद्राने आपल्या एका लाटेबरोबर

टिट्टिभीची अंडी ओढून घेतली. ते पाहून टिट्टिभी आक्रोश करीत म्हणाली, "मी सांगितलं होतं तसंच अखेर घडून आलं!" तेव्हा तिचे सांत्वन करीत धीर-गंभीर टिट्टिभ तिला म्हणाला, "मी या दुष्ट समुद्राला आता कसं वठणीवर आणतो ते पहा!" असे म्हणून त्याने सर्व पक्ष्यांना बोलावून घेतले. त्यांच्यासमोर त्याने समुद्राने केलेला आपला घोर अपराध सांगितला. नंतर आपला राजा जो गरुड पक्षी त्याला तो टिट्टिभ सर्व पक्ष्यांसह शरण गेला. सर्व पक्षी गरुडाला म्हणाले, "महाराज, आपण आमचे राजे. समुद्राने आमच्या एका मित्राचा जो घोर अपराध केला आहे, त्याबद्दल त्याला शासन करून टिट्टिभीची अंडी तिला परत देण्याचं कार्य आपण कृपा करून करा." समुद्राचे दुष्कृत्य ऐकून गरुडालाही राग आला. त्याने विष्णूची मनोभावे प्रार्थना केली. तेव्हा दीनवत्सल विष्णूने अग्निअस्त्राचा उपयोग करून समुद्राला सुकवून टाकले. आणि त्याला टिट्टिभीची अंडी परत देण्यास भाग पाडले.

म्हणून आपत्तीच्या वेळी बुद्धिवंतांनी कधीही आपला धीर सोडू नये.

# जसे धैर्य तशी दैवकृपा

कोण्या एका गावात एक गृहस्थ राहात होता. तो गरीब होता. त्याचे कुटुंब मोठे असल्यामुळे सर्वांच्या उदरनिर्वाहाइतके धन प्राप्त करणे त्याला शक्य होत नव्हते. त्याच्या घरात असलेला बैल हेच एक त्याचे धन होते. द्रव्याच्या अभावी त्याला धान्यादि खाद्य पदार्थ विकत घेणे जेव्हा कठीण होत असे तेव्हा त्याच्यासह कुटुंबातील सर्व माणसांना उपवास घडे. पुढे पुढे तर एकवेळचे पुरेसे जेवणही कोणाला मिळणे कठीण झाले. अशा वेळी स्वतःजवळ असलेला बैल विकून मिळेल त्या द्रव्याने सर्वांच्या उदरनिर्वाहाची सोय करावी असे त्या लोभी गृहस्थाच्या मनात येईना.

त्याने तसे केले असते तर काही दिवस सर्वांच्याच पोटापाण्याची व्यवस्था झाली असती. पण तो स्वतःही कष्टी राहून आपल्या घरातील माणसांनाही कष्टी करत होता. एके दिवशी त्याला वाटले, विंध्यवासिनी देवीची दर्शन घ्याव . अशा विचाराने प्रवास करीत त्याने देवीचे मंदिर गाठले. मंदिरात जाऊन त्याने देवीचे दर्शन घेतले. आणि तिथेच द्रव्य प्राप्त व्हाव या हेतून [illegible]च्या आसनावर पडून राहून, उपास करीत त्याने कडक तपश्चर्या सुरू केली. तेव्हा त्याच्या स्वप्नात येऊन देवी त्याला म्हणाली, "वत्सा, उठ. तुझ्या [illegible]ी असलेला बैल हेच तुझे नेहमीचे धन आहे. तेव्हा त्या बैलाला तू विकून क[illegible] म्हणजे तू दीर्घकाळ सुखासमाधानाने राहशील!" सकाळी झोपेतून उठल्यावर त्याने तपाचे पारणे केले आणि देवीच्या दृष्टांतावर विचार करीतच आपल्या घरी परत गेला.

आता देवीने आज्ञा केल्याप्रमाणे त्याने बैल विकावयास हवा होता त्याला तो विकण्याचे धैर्य होईना. त्याला वाटले या बैलाला जर मी विकले माझ्याजवळचे आहे ते धन नाहीसे होऊन मी निर्धन होईन आणि त्यामुळे जगात आणखी काही दिवस जगायची आशाही राहणार नाही. अशा

विचाराने तो आपल्या पूर्वीच्याच दरिद्री अवस्थेत त्रास सहन करीत

एके दिवसी त्याची एका बुद्धिमंताशी भेट झाली. त्याच्य बोलता त्याने आपणास झालेला देवीचा दृष्टांत त्या बुद्धिमंताला सांगित... उपासाने अशक्त झालेल्या त्या गृहस्थाला तो बुद्धिमंत म्हणाला, "अरे वेड्या एक खच्ची केलेला बैलच तुझे धन आहे म्हणून त्याला विकून तू सदाका सुखासमाधानाने राहशील अशी देवीने तुला आज्ञा केली आहे. पण ती तु स्पष्टपणे कळली नाही. तेव्हा आतातरी शहाणा हो आणि त्या बैलाला वि तुझे आणि तुझ्या कुटुंबातील मंडळींचे पोषण कर. तू तुझ्या जवळच्या बैला विकलेस म्हणजे तुला दुसरा बैल मिळेल. त्या बैलाला तू विकलेस म्हणजे तु तिसरा बैल मिळेल. अशाच तऱ्हेने बैलाची विक्री खरेदी करीत राहिलास म्हण तुला पैसा मिळेल. शिवाय तुझ्याजवळ नेहमीच बैल राहील."

असे त्या बुद्धिमंताचे शब्द ऐकून त्या गृहस्थाने त्याप्रमाणे क ठरविले. त्याने आपल्या जवळचा बैल विकल्यावर त्याला दुसरा बैल मिळा त्याची विक्री केल्यावर त्याला तिसरा बैल मिळाला. अशा रीतीने एकसार मिळत जाणाऱ्या बैलांना विकून टाकून तो गृहस्थ आपल्या कुटुंबा सदासर्वकाळ सुखाने राहू लागला.

प्रत्येक पुरुषाच्या धैर्याप्रमाण दैव फळ देत असते म्हणून सर्व धैर्यशाली व्हावे. सत्त्वहीन पुरुषावर लक्ष्मी प्रसन्न होत नाही.

BVBK-0402981

म. ग्रं. सं. कर्वे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. 39312809 दिनांक 3/3/08
विषय कोशा ... क्र. ........